मुंबई ■ सांगली ■ कोल्हापूर ■ नवे विचार...नवी सुरुवात ■ RNI NO. MAHMAR/2020/79996

दैनिक

# हॅलो प्रभात

■ मुख्य संपादक : गणेश पाटील (सावर्डेकर) Mo. 9011889001

■ सांगली ■ कोल्हापूर ■ सातारा ■ पुणे ■ अहिल्यानगर ■ वर्ष : ६ ■ अंक : १८ ■ शनिवार, १२ जुलै २०२५ ■ किंमत : ३ रुपये ■ पाने : ४




# स्थानिक स्वराज्यसाठी विटयात भाजपमध्येच खडाजंगी ?

## आ.गोपीचंद पडळकर विरोधात वैभव पाटील ; शिंदेसेनेला मात्र मिळाले सुरक्षाकवच







**सांगली : हॅलो प्रभात**

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुती विरोधात महाविकास आघाडी अशा होणार की स्वबळावर लढल्या जाणार हे अद्याप निश्चित नसतानाच राजकीय नेत्यांची धावपळ मोठ्या प्रमाणावर सुरू झाली आहे. विटा पालिकेची निवडणूक ही वैभव पाटील यांच्या दृष्टिकोनातून राजकीय अस्तित्वाचा प्रश्न आहे.**

पक्षांत हालचालींना वेग आला तथापि काँग्रेस 'सत्तेसाठी राजकारण' म्हणतात, त्या गणिताप्रमाणे प्रथम राष्ट्रवादीच्या अजितदादा गटात प्रवेश करून नंतर विधानसभा निवडणुकीला पुन्हा राष्ट्रवादी शरद पक्षातून वैभव पाटलांनी उमेदवारी मिळिवली खरी, पण या निवडणुकीत त्यांना पराभव पत्करावा लागला, पुन्हा त्यांनी भाजपात प्रवेश केला, पण आता विटा पालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपामध्येच संघर्षाची ठिणगी पडली असून आ. गोपीचंद पडळकर यांनी भाजप ही निवडणूक कमळाच्या चिन्हावरच लढणार असे जाहीर केले आहे. प्रांतिय नेत्यांकडून कोणताही आदेश नसताना पडळकर यांनी ही घोषणा करून वैभव पाटलांनाच धक्का देण्याची तयारी सुरू केली असल्याचे राजकीय जाणकारांमध्ये बोलले जात आहे. वैभव पाटील हे भाजपातच असले तरी, त्यांनी वेगळी कोणती हालचाल करू नये, तसेच स्वतंत्र आघाडी करून अधिकाधिक आपल्या समर्थकांना उमेदवारीची खिरापत वाटू नये, विटा पालिका निवडणुकीवर आपलेच वर्चस्व राहावे या दृष्किोनातूनच काही बैठकांना भाजपात प्रवेश केलेल्या वैभव पाटलांना निमंत्रण न दिल्यामुळे आता आ.गोपीचंद पडळकर विरोधात वैभव पाटील अशी खडाजंगी विटा पालिकेच्या निवडणुकीत होणार असल्याचा अंदाज जाणकारांतून व्यक्त केला जात आहे. भाजपांतर्गत सत्तासंघर्षामुळे आ. सुहास बाबर यांच्या नेतृत्वाखालील शिंदेसेनेला मात्र आपोआपच सुरक्षाकवच मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

केंद्रात भाजप, राज्यात महायुती आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक पार्श्वभूमीवर गलितगात्र झालेली महाविकास आघाडी या सर्वांचा विचार करूनच वैभव पाटील यांनी कमळ हातात घेतले. महायुतीतील मित्रपक्ष असलेल्या शिंदेसेनेचा आ.सुहास बाबर यांच्यारूपाने येथे आमदार आहे. त्यामुळे निवडणुका स्वबळावर लढण्याच्या प्रांतिय नेतृत्वाने निर्णय घेतला तर विटा पालिका निवडणुकीची जबाबदारी आपल्याच खांद्यावर येईल, या दृष्टीकोनातूनच भाजपात जाण्याची खेळी वैभव पाटील यांनी केली असली तरी, त्यात आता आ. गोपीचंद पडळकर यांच्यारूपाने अडसर तयार होत आहे. यापुर्वी विटा पालिकेसाठी आ. गोपीचंद पडळकर यांनी घेतलेल्या बैठकांना वैभव पाटील यांना निमंत्रणच नव्हते, त्यांना बाजुला करून स्वत:चे नेतृत्व विटा पालिकेत प्रस्थापित करण्याचा पडळकर यांचा डाव आहे, त्यामुळेच विटा पालिकेवर अनेक वर्षे निर्विवाद सत्ता भोगलेले वैभव पाटील सहजासहजी गप्प बसतील असे वाटत नाही, त्यामुळेच आ. गोपीचंद पडळकर कितीही आक्रमक असले तरी विटा पालिकेच्या निवडणुकीसाठी वैभव पाटील समर्थक इच्छुकांची आघाडी मैदानात उतरण्याची शक्यता राजकीय जाणकारांमधून व्यक्त केली जात आहे. आ. सुहास बाबर आणि वैभव पाटील हे पारंपरिक प्रतिस्पर्धी आहेत, स्वबळावर निवडणूक लढविण्याचा निर्णय भाजपने घेतला तर त्याचा सर्वाधिक फायदा शिंदेसेनेलाच होणार आहे.

तुमचं वृत्तपत्र आता तुमच्या मोबाईलवर!

खालील QR कोड स्कॅन करा आणि आजचा e-paper वाचा.

हॅलो प्रभात

सोबत वाचनाचा नवा डिजिटल अनुभव

सहज,जलद आणि स्मार्ट!

## 'प्रहार' च्या कार्यकर्त्यांचा भाजपामध्ये प्रवेश

**मुंबई : हॅलो प्रभात**



लातूर जिल्ह्यातील चाकूर नगरपंचायतीचे माजी अध्यक्ष व प्रहारचे नेते कपील माकणे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शरद पवार गटाचे निळकंठ मिरकले यांच्यासह शरद पवार गट, प्रहार च्या असंख्य कार्यकर्त्यांनी शुक्रवारी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमामध्ये प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सर्वांचे पक्षात स्वागत केले. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष खा. डॉ. अजित गोपछडे, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, आ. संभाजी पाटील निलंगेकर, अर्चना पाटील चाकुरकर, मराठवाडा विभागीय संघटनमंत्री संजय कोडगे, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी उपस्थित होते. यावेळी शरद पवार गटाचे डॉ. गोविंद माकणे, चाकूर कृ.उ.बा.स. उपसभापती लक्ष्मण दंडिमे यांनीही भाजपामध्ये प्रवेश केला.

यावेळी श्री. चव्हाण म्हणाले की पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या खंबीर नेतृत्वावर विश्वास ठेवून या सर्वांनी भाजपा मध्ये प्रवेश केला आहे. या कार्यकर्त्यांच्या विश्वासाला तडा जाणार नाही. आपण सर्वजण भाजपाची राष्ट्रीय विचारधारा मजबूत करण्यासाठी तसेच राज्याला विकासात अग्रेसर बनवण्यासाठी झटून काम करूया असे आवाहन केले. या कार्यकर्त्यांनी मांडलेले प्रश्न मार्गी लावण्यासाठी कसून प्रयत्न करण्यात येतील असेही ते म्हणाले. भाजपा मध्ये प्रवेश केलेल्यांमध्ये चाकूर कृ.उ.बा.स. चे संचालक बाबूराव सूर्यवंशी, दत्ता कलाले, मुरंबीचे सरपंच, उपसरपंच सुनिल चिंताले व हिरकनबाई लाटे, बाळू लाटे आदींचा समावेश आहे.

## CPR मध्ये वैद्यकीय साहित्य खरेदीत घोटाळा



### दर करार पत्राच्या आधारे ४ कोटींचा बनावट पुरवठा मनविसेचा आंदोलनाचा इशारा

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

शहरातील छत्रपती प्रमिला राजे रुग्णालयात झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या वैद्यकीय साहित्य खरेदी घोटाळ्याने खळबळ उडाली आहे. मुलुंड आणि वरळी येथील कामगार रुग्णालयांचे बनावट दर करार पत्र वापरून ठेकेदार लिंबेकर याने एकूण ९ कोटी १४ लाख रुपयांचे टेंडर मिळवून महाप्रचंड भ्रष्टाचार केल्याचे समोर आले आहे.

या प्रकरणात ठेकेदार लिंबेकरविरोधात ४ कोटी ८६ लाख रुपयांच्या फसवणुकीचा गुन्हा २०२२-२३ मध्ये दाखल झाला असून, तो सध्या फरार आहे. विशेष बाब म्हणजे, यामध्ये सहभागी असलेले संबंधित प्रशासकीय अधिकारी अद्यापही मोकाट आहेत.अलीकडेच आणखी एका प्रकरणात लिंबेकर याने वरळी-मुलुंड येथील कामगार रुग्णालयाच्या दर करार पत्रांचा वापर करत ४ कोटी २८ लाख रुपयांचे टेंडर मिळवले, साहित्य पुरवले आणि त्याचे बिलही अदा करण्यात आल्याचे समोर आले आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेने (मनविसे) यावर तीव्र संताप व्यक्त केला असून, ८ दिवसांत कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. मनविसेच्यावतीने करण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, फक्त ठेकेदारावर गुन्हा दाखल करून प्रकरण थांबवले जाऊ नये. संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवरही गुन्हे दाखल करून त्यांना सेवेतून बडतर्फ करावे. शासनाची लुटलेली रक्कम त्यांच्याच संपत्तीतून वसूल करावी. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई झाली नाही, तर आरोग्य व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास डळमळीत होईल, अशी संतप्त भावना जनतेतून व्यक्त होत आहे.

## राजारामबापू क्रीडा संकुलातून राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू घडवू : प्रतिकदादा पाटील

**इस्लामपूर : हॅलो प्रभात**



युवकांनी मन,मेंदू व मनगट मजबूत करण्यास प्राधान्य द्यावे. सशक्त व बलवान युवकच समाजात सकारात्मक बदल घडवू शकतात,असा विश्वास राजारामबापू कारखान्याचे अध्यक्ष व युवा नेते प्रतिकदादा पाटील यांनी व्यक्त केला. राजारामबापू क्रीडा संकुलातून राज्य व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू निश्चित घडतील,असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखान्याच्या राजारामबापू इंडोमेन्ट ट्रस्टच्या माध्यमातून राजारामबापू इनडोअर स्टेडियममध्ये विस्तारित व अद्यावत जिमचे प्रतिकदादा पाटील यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते. कारखान्याचे उपाध्यक्ष विजयराव पाटील, जिमखाना व कामगार कल्याण समितीच्या अध्यक्षा प्रा.डॉ.योजना शिंदे-पाटील, संचालक विठ्ठल पाटील, प्रदीपकुमार पाटील,अमरसिंह साळुंखे, दिपक पाटील, रघुनाथ जाधव, कार्यकारी संचालक आर.डी.माहुली प्रामुख्या ने उपस्थित होते. याप्रसंगी विविध स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंचा सन्मान करण्यात आला. प्रारंभी लोकनेते राजारामबापू पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मयुरी पाठक हिचा विशेष सन्मान करण्यात आला.

विजयराव पाटील म्हणाले, राजारामबापू क्रीडा संकुलाचा तालुक्यातील,जिल्ह्यातील विद्यार्थी व खेळाडूंना चांगला उपयोग होत आहे. याप्रसंगी सुनिल पाटील,मानसी पवार, सतिश गुरव,समर्थ सावंत,क्षितीजा पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. प्रारंभी प्रा.डॉ.योजना शिंदे-पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. कार्यकारी संचालक आर. डी.माहुली यांनी आभार मानले. संचालक शैलेश पाटील, रामराव पाटील, बबनराव थोटे, रमेश हाके, हणमंत माळी यांच्यासह अधिकारी, खेळाडू, तसेच प्रशिक्षक सचिन भिलारे उपस्थित होते. निलेश साठे यांनी सुत्रसंचालन केले.

## संक्षिप्त...

### कोल्हापूर 'एसटी'ला विठ्ठल पावला!

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

राज्य परिवहन महामंडळाच्या कोल्हापूर विभागाने आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर यात्रेसाठी केलेल्या विशेष नियोजनाला मोठे यश मिळाले आहे. २ ते ८ जुलै या आठ दिवसांच्या कालावधीत विभागाच्या बसगाड्यांनी तब्बल २ लाख १९ हजार ८२१ किलोमीटरचा प्रवास करत १ कोटी ९२ लाख १७३ रुपयांचे विक्रमी उत्पन्न मिळवले आहे. या उल्लेखनीय सेवेमुळे हजारो वारकऱ्यांचा पंढरपूर प्रवास सुखकर आणि सुरक्षित झाला, अशी माहिती विभागीय वाहतूक अधिकारी संतोष बोगरे यांनी दिली.

### चांदीचा दरवाजा विठ्ठल मंदिरास दान

**पंढरपूर : हॅलो प्रभात**

पंढरपुरात दोन शिष्यांनी गुरूने दिलेला आदेश पाळत विठ्ठलचरणी ८७ किलो चांदीचा दरवाजा अर्पण केला. त्याची किंमत १ कोटी १० लाख रुपये आहे. हा चांदीने मढवलेला दरवाजा विठ्ठलाच्या गाभाऱ्यात जाणाऱ्या चौखांबी येथे बसवण्यात आला आहे. गुरुपौर्णिमेनिमित्त गुरू-शिष्य परंपरेचे एक अनोखे उदाहरण भाविकांना पाहायला मिळाले.

## सांगली-पेठ रस्ता वाहतुकीस संपूर्ण टोलमुक्त व्हावा

### ना.गडकरी यांची तत्वतः मंजुरी; आ.गाडगीळ यांची माहिती

**सांगली : हॅलो प्रभात**



सांगली पेठ या अत्यंत महत्त्वपूर्ण अशा मार्गास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्यासाठी केंद्रीय रस्ते आणि वाहतूक मंत्री ना.नितीन गडकरी यांनी तत्वतः मंजुरी दिली आहे. आमदार सुधीरदादा गाडगीळ यांनी ही माहिती दिली.

दरम्यान सांगली पेठ रस्त्यावर टोल नाका बसू नये. या रस्त्यावरील वाहतुकीस संपूर्ण टोलमुक्ती द्यावी अशीही मागणी आमदार गाडगीळ यांनी ना. गडकरी यांच्याकडे केली आहे. ना. गडकरी यांनी या मागणी संदर्भातही विचार केला जाईल असे आश्वासन दिले आहे. आ.गाडगीळ यांनी सांगली पेठ रस्त्यास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव द्यावे यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. नामदार गडकरी यांच्याकडे आग्रही मागणी केली होती.

सांगली पेठ हा सांगली पुणे मुंबई महामार्गास जोडणाऱ्या मार्गाचे काम अनेक वर्षे रखडलेले होते. मात्र आमदार गाडगीळ यांनी या रस्त्याच्या पूर्ततेसाठी सातत्याने राज्य आणि केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला होता. या पाठपुरावामुळेच या रस्त्याच्या कामाचा केंद्रीय रस्ते वाहतूक विभागात समावेश करण्यात आला होता आणि त्यानंतर नामदार गडकरी यांनी यासाठी मोठी रक्कम मंजूर केली होती. आता या रस्त्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. साहजिकच ह्या रस्त्याला कुणाचे नाव द्यावे असा विषय पुढे आला होता. आमदार गाडगीळ यांनी या रस्त्याला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव द्यावे अशी मागणी ना. गडकरी यांच्याकडे केली होती त्यांनी त्या मागणीला तत्वतः मंजुरी दिली आहे. त्याचबरोबर हा रस्ता टोलमुक्त करण्याच्या मागणीबाबत विचार केला जाईल असे आश्वासनही दिले ना.गडकरी यांनी आमदार गाडगीळ यांना दिले आहे.






# संस्कार देणारी प्रत्येक व्यक्ती आपला 'गुरू'

प्राचीन काळापासून गुरूच्या स्मरणार्थ आषाढ महिन्यातील 'पौर्णिमा'साजरी करण्याची परंपरा गेल्या ५ हजार वर्षांपूर्वीची आहे. त्यामुळेच भारतात गुरूपौर्णिमेला आगळेवेगळे महत्व असल्याचे आपल्याला दिसुन येते.गुरू पौर्णिमेच्या निमित्ताने सर्वांनीच गुरू या शब्दाचा मान–सन्मान करने अत्यंत गरजेचे आहे.कारण 'गुरू शिवाय ज्ञान नाही'ही म्हण सत्य आहे.गुरू पौर्णिमेचे महत्व जाणून चांगले विचार आचरणात आणायला हवे. गुरूचे महत्व म्हणजे ज्यांच्यापासुन आपल्याला चांगल्याप्रकारची चालना,गुण, शिक्षण, प्रशिक्षण, मार्गदर्शन, प्रेम,आपुलकी, प्रेरणा, संस्कार जिव्हाळ्याच्या गोष्टी इत्यादींचे जो व्यक्ती चांगले आणि महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करतो तोच आपला खरा गुरु समजायला पाहिजे.'आई–वडिल' हे गुरू या परीभाषेपेक्षाही महान आणि मोठे आहेत.जो पर्यंत सुर्य–चंद्र–आकाश–पाताळ आहे तोपर्यंत आई–वडीलांचा मान गुरू पेक्षाही महान आहे आणि राहील यात दुमत नाही.कारण आई–वडीलां समोर सर्वच नतमस्तक होतात आणि व्हायला हवे.ज्याप्रमाणे संपूर्ण सृष्टी पृथ्वी मातेसमोर नतमस्तक होते.आई मायेचे पांघरूण घालुन मुला–मुलींना लहानाचे मोठे करते तर वडील संपूर्ण कुटुंबाची ढाल बनून कुटुंबाचे रक्षण करण्याचे काम करीत असतो. त्यामुळे आपण नेहमी पहातो की छोटी दुर्घटना घटना घडली तर आपण 'आईग' म्हणुन आईला हाक मारतो यावेळी आईच्या रूपात सर्वच धावुन येतात.यामुळे आपले दु:ख कमी होते.त्याच्या विपरीत जर मोठी घटना घडली तर आपण 'बापरे' म्हणतो.यावेळेस संपूर्ण गाव जमा होवुन वडिलांच्या रूपात धावुन येतो.अशाप्रकारे आई–वडीलांचे नाते किती महान व अनभिज्ञ आहे जगात दिसून येते. म्हणजेच या जगात जो आपले पालन–पोषन करतो तो आपला सर्वात मोठा गुरू आहे. वडिलांचे नाते किती महान आहे हे आपण समजू शकतो.त्याचप्रमाणे आपण नेहमी पहातो की आई–वडीलांचा अपमान कोनीही सहन करीत नाही आणि करणार नाही.अशा परिस्थितीत मुलं–मुली तुटून पडतात.यात खरे गुरु–शिष्याचे नाते दिसून येते.म्हणजेच जगाच्या पाठीवर सर्वात मोठे गुरू–शिष्याचे नाते म्हणजे आई–वडिलच. यात मोठा वाटा म्हणजे आई–वडीलांचे मुलांवरील संस्कार व मार्गदर्शन.यातुनच गुरू–शिष्याचा जन्म झाला.आई गुरूची भुमिका बजावुन वटवृक्षाच्या अफाट सावलीत मुलांची जोपासना करते तर वडील याच वटवृक्षाचा पहारेकरी बनुन परिवाराचे जतन व संरक्षण करते.मानसाच्या आयुष्यात अनेक उतारा–चढाव येतात, कठीण समस्या येतात, सुख–दु:खाच्या घटना घडतात. याकरीता वेगवेगळ्या मार्गदर्शनासाठी प्रत्येकाला गुरूची आवश्यकता असते.कारण गुरू शिवाय संपूर्ण मार्ग अधुरा असतो. आपण शिक्षणाच्या क्षेत्रात जेव्हा पाय ठेवतो.तेव्हा शिक्षक आपला गुरुच असतो. कारण पुढील आयुष्याचे खरे मार्गदर्शन आपल्याला शिक्षकांपासुन मिळत असते.आपण शाळेतल्या पहिल्या पायरीपासुन तर शेवटच्या पायरीपर्यंत म्हणजे अंतीम शिक्षणापर्यंत शिक्षक आपला गुरूच असतो.कारण यांच्या पासुनच आपल्या बुध्दीमत्तेचा आणि पुढील वाटचालीचा मार्ग मोकळा होतो व आपल्याला पुढील दिशा आणि मार्ग दिसून येतात.त्याचप्रमाणे क्रीडाक्षेत्रात पदार्पण करतांना गुरूची अत्यंत आवश्यकता असते.कारण संपूर्ण क्रीडाक्षेत्राचे भवितव्य आपल्या गुरू विद्येवर अवलंबून असते.त्यामुळे आपण क्रीडाक्षेत्रात नेहमी पहातो की कुशलता, कर्तबगारी, उत्कृष्ट खेळाडू आणि पराक्रमी खेळाडू तयार करतांना गुरू–शिष्याची संपूर्ण कसोटी लावून आपली ताकद झोकल्या जाते. तेव्हाच पीटी उषा, कपिल देव, तेंडुलकर, दारासिंग,खली, मिल्खासिंग, मेजर ध्यानचंद,निरज चोपडा असे अनेक नामांकित व महान खेळाडू गुरूमुळेच तयार झाले आणि होतात सुध्दा. गुरूच्या परीक्षेत जो–जो पास होतो.तीच शिष्यांकडून गुरु दक्षिणा असते.आपण महाभारत ते रामायणमध्ये गुरू–शिष्याचे काय नाते असते ते आपण जाणतोच. व्दापरयुग,सत्ययुग,कलयुग किंवा कोणतेही युग असो गुरू शिवाय पुढचा मार्ग निघने अवघड असते.याकरीता गुरूची आवश्यकता असने गरजेचे असते.राजकीय क्षेत्राचा विचार केला तर यातही आपल्याला गुरू–शिष्याचे नाते दिसून येते.यातुन राजकीय पुढारी तयार होतात.आपण पारतंत्र्यात असतांना स्वतंत्र लढा जिंकण्यासाठी क्रांतीकारकांनी आपल्या गुरूंच्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्र्याचा लढा उभा केला.त्यामुळेच आज आपण स्वतंत्र भारतात राहून मोकळा स्वास घेवु शकतो.

कारण क्रांतीकारकांना गुरूचे मार्गदर्शन योग्य लाभले त्यामुळेच क्रांतिकारक शिष्यांनी भारताला स्वतंत्र मिळवून दिले.त्यामुळे गुरू शिवाय कोणतेही काम होने शक्य नाही. याकरीता कोणतेही क्षेत्र असो अनुभव,ज्ञान,माहीती मिळवण्यासाठी गुरूची तेवढीच आवश्यकता असते.म्हणुनच म्हटल्या जाते 'गुरू बिना ज्ञाण अधुरा'. त्याचप्रमाणे आपण पुजाअर्चना करतो याचे मुख्य कारण म्हणजे एकाग्रता निर्माण व्हावी.आपण आपले काम फत्ते व्हावे याकरिता देवी–देवता व पुर्वजांची पुजाअर्चना करतो.कारण आपण केलेल्या कार्याला यश प्राप्त झाले पाहिजे.भारत भुमित गौतम बुद्ध, ऋषीमुनी, त्यागी, साधुसंत,थोरमहात्मे होवुन गेले.याच्याच पाऊलावर पाऊल ठेवून योगा व व्यायामाच्या मदतीने आपले शरीर सुदृढ आणि निरोगी ठेवण्यासाठी प्रयत्नशील असतो. त्यामुळे आज भारताला योगाच्या बाबतीत विर्श्व गुरू म्हणुन संबोधल्या जाते. त्याचप्रमाणे भारताला विर्श्व शांतीचा गुरू सुध्दा संबोधल्या जाते. कारण जगाच्या पाठीवर शांतीपूर्ण देश म्हणजे भारताची जगात प्रचीती आहे. म्हणजेच आज भारत विर्श्व शांतीचा गुरू असल्याचे दिसून येते. ह्या संपूर्ण घटनांचे मुख्य कारण म्हणजे भारतीय संस्कृती, परंपरा, संपूर्ण धर्माची जोपासना यामुळेच भारताला विर्श्व गुरू म्हणून संबोधल्या जाते.गुरू पोर्णिमेच्या निमित्ताने हेच सांगु इच्छितो की मुलांनी आई–वडीलांच्या सेवेला,त्यांच्या आज्ञेला व त्यांनी सांगितलेल्या कामाला प्रथम प्राधान्य देवून गुरू–शिष्याच्या नात्याची जोपासना सर्वांनीच केली पाहिजे.आताही भारतात गुरु शिष्याचे नाते अतूट आहे व टिकुन आहे याचे मुख्य कारण म्हणजे भारतीय संस्कृती, भारतातील अनेक धर्म,जाती–पंथ यांचा एकत्रित पणा यामुळेच आपल्याला गुरु–शिष्याचे नाते अधिक घनिष्ठ असल्याचे दिसून येते.शिष्यांनी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की ज्यांच्या पासून आपण प्रेरणा घेतो,त्याची अवहेलना कुठेही होणार नाही याची काळजी सर्वांनीच घेतली पाहिजे.ज्याच्या परिसरात जागा नसेल त्यांनी एखाद्या कुंडीमध्ये झाड लावुन वृक्षारोपण करायला हवे.कारण वाढते प्रदुषण मानव, जिवजंतू, वन्यप्राणी यांच्यासाठी अत्यंत धोकादायक स्थितीत आहे.त्यामुळे गुरू पोर्णिमेचे औचित्य साधून वृक्षारोपणावर भर दिला पाहिजे व पृथ्वी मातेचे रक्षण केले पाहिजे.

# ७ चित्रपट रौप्यमहोत्सवी देणारे 'ज्युबिली कुमार'

**राजेंद्र कुमार हे हिंदी फिल्मइंडस्ट्रीमधील अभिनेता आहेत. त्यांच्या काळात त्यांनी बराच नावलौकिक मिळवला होता. त्यांचे बरेचसे चित्रपट खूप प्रसिद्ध आहेत. आज त्यांची पुण्यतिथी. यानिमित्ताने...**

● **जन्म :** राजेंद्र कुमार यांचा जन्म २० जुलै १९२९ रोजी सियालकोट, पंजाब येथे झाला. १९६०–७० या दशकातील ते एक प्रसिद्ध अभिनेता होते. राजेन्द्र कुमार यांनी १९५० च्या जोगन या चित्रपटांपासून सुरुवात केली. या चित्रपटात त्यांनी दिलीप कुमार आणि नर्गिस यांच्यासोबत काम केले आहे.

१९५७ मधील 'मदर इंडिया' या चित्रपटात त्यांनी नर्गिस यांच्या मुलाची भूमिका केली ती खूप गाजली. १९५९ मधील 'गूंज उठी शहनाई' या चित्रपटाच्या यशाने त्यांना अभिनेता म्हणून भरपूर ओळख मिळाली. १९६० च्या दशकात एकापाठोपाठ एक असे ७ चित्रपट रौप्यमहोत्सवी सिल्वर जुबली झाल्याने त्यांना लोक 'ज्युबिली कुमार' म्हणून ओळखू लागले.

● **वैयक्तिक जीवन :** राजेंद्र कुमार यांचा विवाह शुक्ला नावाच्या स्त्रीशी झाला आणि त्यांना तीन मुले आहे. एक मुलगा व दोन मुली. त्यांचा मुलगा कुमार गौरवचे लग्न राज कपूरची मुलगी रीमासोबत निश्चित झाले होते पण काही कारणास्तव हे नातं तुटले. त्यानंतर सुनील दत्त आणि नर्गिस यांची मुलगी नम्रता जी संजय दत्तची बहीण आहे तिच्याशी झाले. राजेंद्र कुमार आणि राज कपूर हे वैयक्तिक आयुष्यातील खूप जवळचे मित्र होते. परंतु त्यांचे संबंध मुलांच्या ब्रेकअपमुळे वाढले. सुनील दत्तचा तो जवळचा मित्रही होता आणि सुनील दत्तच्या म्हणण्यानुसार, मुलगा संजय दत्तच्या संकटाला सामोरे जात असताना राजेंद्र कुमारने त्यांना खूप मदत केली. त्यांना सर्वश्रेष्ठ अभिनेता म्हणून फिल्मफेअर पुरस्कारासाठी दिल एक मंदिर, आई मिलन की बेला आणि आरजु तसेच सर्वश्रेष्ठ सहअभिनेता म्हणून 'संगम' या चित्रपटांसाठी नामांकित केले गेले. १९८१ मध्ये त्यांनी आपला पुत्र कुमार गौरव याला 'लव स्टोरी'मधून चित्रपटात आणले. या चित्रपटाचे ते निर्माता–दिग्दर्शक तर होतेच पण त्याचबरोबर यामध्ये त्यांनी कुमार गौरवच्या वडिलांची भूमिका केली होती. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर हीट झाला. त्यानंतर त्यांनी कुमार गौरव याच्यासोबत संजय दत्त याला घेऊन 'नाम' चित्रपट बनवला व हाही चित्रपट बॉक्स ऑफीसवर चांगलाच गाजला. राजेंद्रकुमार यांनी अभिनय केलेला शेवटचा चित्रपट 'अर्थ' होता.

● **जीवन :** हिंदी चित्रपटसृष्टीच्या सुवर्णयुगात असे अनेक महान कलाकार होते ज्यांनी सिनेसृष्टीला अनेक क्षण आनंदाचे क्षण दिले. यातील एक उत्तम कलाकार म्हणजे राजेंद्र कुमार. अभिनेता राजेंद्र कुमार यांची आज पुण्यतिथी आहे. जेव्हा दिलीपकुमार सरदार आणि ट्रॅजेडी किंग अभिनय करीत होता तेव्हा राजेंद्र कुमार ज्युबिली स्टार होता. अभिनय जगतात राजेंद्र कुमारचे वेगळे स्थान आहे.

बॉलिवूडमधील सुवर्ण त्रिकूट दिलीप कुमार, देव आनंद आणि राज कपूर यांच्या युगात राजेंद्र कुमार असा एक अभिनेता होता, ज्याने केवळ स्वत:चे स्थान नाही तर बॉक्स ऑफिसवर यशाची नवी कहाणीही लिहिली. ज्युबिली कुमार म्हणून प्रसिद्ध असलेल्या राजेंद्र कुमार यांना बॉक्स ऑफिसची नाडी चांगलीच समजली. प्रेक्षकांना कोणत्या प्रकारचे चित्रपट आवडतात आणि कोणत्या प्रकारचे चित्रपट आवडत नाहीत हे त्यांना ठाऊक होते.

हिंदी सिनेमाच्या पहिल्या मेगास्टार दिलीप कुमारबरोबर पहिल्याच चित्रपटात काम करण्याची संधी मिळाली, हे त्यांचे नशिब तसेच त्यांची क्षमतादेखील होती. चित्रपटाचे नाव होते 'जोगन' यामध्ये त्यांच्याबरोबर नर्गिसही होती.

● **राजेंद्र कुमार यांचे चित्रपट :** राजेंद्र कुमार यांचे चित्रपट राजेंद्र कुमार यांनी १९५० आणि ६० च्या दशकात अनेक हिट चित्रपट केले. त्यापैकी धूल का फूल, मेरे मेहबूब, संगम आणि अर्जू प्रमुख होते. फिल्मफेअर पुरस्कारांसाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्याच्या श्रेणीत राजेंद्र कुमार यांना तीन नामांकने मिळाली होती, परंतु त्यांना हा पुरस्कार कधीच मिळाला नाही कारण हे महान कलाकारांचे एक युग होते, उदाहरणार्थ, दिलीप कुमार हा शोकांतिकेचा राजा होता आणि देवानंद रोमांसचा राजा होता. परंतु जनतेने नेहमीच त्यांचा पुरस्कार आणि आदर राजेंद्र कुमार यांना दिला. त्यांच्या चित्रपटांना इतके यश मिळाले की, त्यांना ज्युबिली कुमार हे नाव देण्यात आले. हे यश असूनही कुमार यांचे पाय जमिनीवर कायमच राहिले. वैयक्तिक आयुष्यात तो एक अतिशय निराश व्यक्ती होता.

निवडीचा अनुभव राजेंद्र कुमार यांच्याबद्दल एक गोष्ट अतिशय प्रसिद्ध आहे की ते आपले चित्रपट अतिशय सावधगिरीने निवडत असत आणि कदाचित यामुळेच त्यांचे बहुतेक चित्रपट यशस्वी झाले. अभिनयानंतर प्रोडक्शन कुमारने आपला मुलगा कुमार गौरवला १९८० च्या दशकात 'लव्ह स्टोरी' या चित्रपटाद्वारे अभिनय जगतात ओळख दिली. हा चित्रपट बऱ्यापैकी यशस्वी झाला होता, परंतु कुमार गौरवला हे यश जास्त काळ टिकवता आले नाही.

आज आपल्याकडे बॉलिवूडच्या सुवर्णकाळातील बरेच कलाकार नाहीत. देवानंद, शम्मी कपूर, जगजितसिंग, राजेश खन्ना यासारखे अभिनेते आता आपल्यात नाहीत. राजेंद्र कुमारदेखील खूप पूर्वी हे जग सोडून गेले होते. पण त्या काळातील यश आणि कहाणी कधीच पुन्हा सांगता येणार नाही जेव्हा लोक चित्रपटांच्या तिकिटांसाठी तासन्तास रांगेत उभे राहायचे.

अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये काम करणारे राजेंद्र कुमार यांच्या इंडस्ट्रीतील लोकांना कशर म्हणायचे. त्यांची आर्थिक परिस्थिती बिकट झाली तेव्हा त्यांनी आपला 'लकी' बंगला राजेश खन्नाला विकला आणि हा बंगला सोडायचा वेळ आली तेव्हा ते रात्रभर रडत होते. त्यांनी नायक होण्यासाठी ५० रुपये घेऊन मुंबई गाठली होती.



१२ जुलै : पुण्यतिथीनिमित्ताने...

राजेंद्र कुमार यांना चित्रपटांमध्ये काम करण्यासाठी खूप संघर्ष करावा लागला. जेव्हा तो हिरो होण्याचे स्वप्न घेऊन मुंबईला आला, त्यावेळी त्यांच्या खिशात फक्त ५० रुपये होते, जे आपल्या वडिलांकडून मिळालेले घड्याळ विकून मिळवले. गीतकार राजेंद्र कृष्णाच्या मदतीने त्यांना १५० रुपये पगारावर दिग्दर्शक एच. एस. रावेल यांच्याकडे सहाय्यकपदाची नोकरी मिळाली.

राजेंद्र कुमार यांना १९५० साली 'जोगन' या चित्रपटात काम करण्याची संधी मिळाली. या चित्रपटात त्यांच्यासोबत दिलीप कुमार मुख्य भूमिकेत होता. १९५० ते १९७७ या काळात राजेंद्र कुमार यांनी चित्रपटसृष्टीत आपले स्थान निर्माण करण्यासाठी खूप मोठा संघर्ष केला. १९५७ मध्ये आलेल्या 'मदर इंडिया' या चित्रपटात त्यांची छोटी भूमिका होती.

सुरूवातीला राजेंद्र कुमार यांनी वांद्रे येथील कार्टर रोडवरील समुद्रकिनार असलेला हा बंगला अभिनेता भारत भूषणकडून ६० हजार रुपयांमध्ये खरेदी केला. त्याने त्याला एक नवीन रूप दिलं आणि आपल्या बंगल्याचे नाव 'डिंपल' ठेवले.

● **बंगला विकण्याची वेळ :**

या बंगल्यात येताच राजेंद्र कुमार यांना प्रचंड प्रमाणात यश मिळू लागले. या कारणासाठी हा बंगला भाग्यवान मानला जात असे. राजेंद्र कुमार हे हा बंगला विक्री करीत असल्याचे जेव्हा राजेश खन्नाला समजले तेव्हा त्यांनी त्वरित तो खरेदी करण्याचा निर्णय घेतला. बंगला विकत घेतल्यानंतर राजेश खन्ना यांनी त्यास 'आशिर्वाद'असे नाव दिले.

हा बंगला राजेश खन्नासाठीही खूप भाग्यवान ठरला. त्यामध्ये बदलल्यानंतर त्याने एकामागून एक १५ हिट फिल्म्स दिली. यामुळेच त्याला हा बंगला खूप आवडला. आयुष्यातील शेवटचा वेळही त्याने या बंगल्यात घालवला. नंतर शशी, किरण, शेट्टी यांनी तो विकत घेतला. शशीने बंगला पाडला आहे आणि त्याच्या जागी पाच मजली इमारत तयार केली आहे.

● **पुरस्कार :** राजेंद्र कुमार यांना पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते 'कानून' आणि 'हेन्ना रंग लाग्यो' गुजराती या चित्रपटांसाठी राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित केले गेले त्यांना १९६९ मध्ये पद्मश्री हा पुरस्कार देण्यात आला. त्यांना शास्त्री राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले आणि ते अनेक सेवाभावी संस्थांशी संबंधित होते.

● **मृत्यू :** आयुष्याच्या शेवटच्या दिवसांत राजेंद्र कुमार कर्करोगाने बळी पडले आणि १२ जुलै १९९९ रोजी त्यांचे निधन झाले.

## महिंद्रा फ्युरियो ८ तर्फे सर्वाधिक मायलेज आणि नफ्याची हमी

**मुंबई : हॅलो प्रभात**



महिंद्रा ट्रक अँड बस बिझनेस (एमटीबी) या महिंद्रा समूहाचा भाग असलेल्या कंपनीने महिंद्रा फ्युरियो ८ लाँच करत असल्याचे जाहीर केले आहे. ही आधुनिक, हलक्या कमर्शियल ट्रक्सची श्रेणी असून त्यावर 'सर्वाधिक मायलेज मिळवा, अन्यथा ट्रक परत द्या' अशी अनोखी हमी देण्यात येत आहे. चाकण, महाराष्ट्र येथे महिंद्राच्या जागतिक दर्जाच्या उत्पादन कारखान्यात तयार करण्यात आलेल्या महिंद्रा फ्युरियो ८ मध्ये ४ टायर्स कार्गो आणि ६ टायर्स कार्गो हे दोन व्हेरिएंट्स देण्यात आले आहेत. यामुळे एलसीव्ही विभागातील ग्राहकांच्या वैविध्यपूर्ण व्यवसायासाठी मदत होईल. फ्युरियो ८ मध्ये सर्वोत्तम मायलेज, अधिक पेलोड क्षमता आणि आरामदायीपणा, सोयीस्करपणा व सुरक्षेसह अत्याधुनिक केबिन देण्यात आली आहे. ही वैशिष्ट्ये लक्षात घेता फ्युरियो ८ या श्रेणीत सर्वोच्च नफा मिळवून देण्यासाठी तयार करण्यात आली आहे. म्हणूनच 'ट्रक बदलो, तकदीर बदलेगी' असा दावा करण्यात आला आहे.

## ७४ वर्षीय व्यक्तीच्या हृदयातून लिंबाच्या आकाराचा ट्यूमर काढण्यात आला

**मुंबई : हॅलो प्रभात**

नानावटी मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी मुंबईतील ७४ वर्षीय व्यक्तीला नवसंजीवनी दिली आहे. त्यांच्या हृदयात लिंबाच्या आकाराचा ट्यूमर (५५ सेमी) होता आणि रक्तवाहिन्यांमध्ये गंभीर अडथळा निर्माण झाला होता. प्रगत मिनिमली इनव्हेसिव्ह कार्डियाक सर्जरी (एमआयसीएस) वापरून, या हॉस्पिटलच्या सर्जिकल टीमने ट्यूमर यशस्वीरित्या काढून टाकला आणि छातीच्या उजव्या बाजूला ब्लॉक झालेल्या धमनीमध्ये रक्त प्रवाह पुन्हा सुरळीत केला. रुटीन इकोकार्डियोग्राममध्ये लक्षात आले की, या ७४ वर्षीय व्यक्तीला लेफ्ट ॲट्रियल मायक्सोमा – हृदयाच्या डाव्या वरच्या चेंबरमध्ये दुमिळ स्वरूपाचा पण कर्करोग नसलेला ट्यूमर असल्याचे लक्षात आले. त्यांच्यावर उपचार करणारे डॉक्टर, नानावटी मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे वरिष्ठ कार्डिओलॉजिस्ट डॉ सिद्धार्थ शेठ यांनी पुष्टी केली की या ट्यूमरने डाव्या ॲट्रियमचा जवळजवळ ९०% भाग व्यापलेला होता. हृदयाला रक्तपुरवठा करणारी एक प्रमुख रक्तवाहिनी असलेल्या उजव्या कोरोनरी धमनीमध्ये ८५–९०% ब्लॉकेज होते. त्यांना गेल्या बऱ्याच वर्षांपासून अनियंत्रित मधुमेहाचा त्रास होता, त्यामुळे त्यांच्या पारंपारिक ओपन–हार्ट सर्जरीमध्ये गुंतागुंत होण्याचा धोका जास्त होता, ज्यामुळे ही केस खूप गुंतागुंतीची बनली होती.

## अदानी पॉवरकडून ६00 मेगावॅट क्षमतेच्या विदर्भ पॉवरचे अधिग्रहण पूर्ण

**अहमदाबाद : हॅलो प्रभात**

भारतातील सर्वात मोठी खाजगी थर्मल पॉवर उत्पादक कंपनी असलेल्या अदानी पॉवर लिमिटेड (एपीएल) ने विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लिमिटेड (व्हीआयपीएल) या कंपनीच्या खरेदी व रिझोल्यूशन प्लॅनची अंमलबजावणी यशस्वीपणे पूर्ण केली आहे. ही डील एकूण ४,000 कोटी रुपयांच्या व्यवहारात पार पडली आहे. व्हीआयपीएल हा नागपूर जिल्ह्यातील बुटीबोरी येथे असलेला २×३00 मेगावॅट क्षमतेचा देशांतर्गत कोळशावर चालणारा थर्मल वीज प्रकल्प आहे.

व्हीआयपीएल सध्या इन्सॉल्व्हन्सी आणि बँक्रप्सी कोड (आयबीसी) अंतर्गत कॉर्पोरेट इनसॉल्व्हन्सी रिझोल्यूशन प्रक्रियेतील (सीआयआरपी) होती. १८ जून २०२५ रोजी नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनलच्या (एनसीएलटी) मुंबई खंडपीठाने अदानी पॉवरच्या रिझोल्यूशन प्लॅनला मंजुरी दिली. त्यानंतर, ७ जुलै २०२५ रोजी या योजनेची यशस्वी अंमलबजावणी करण्यात आली.

## ५जी–सक्षम प्रगत रूग्णवाहिका सेवा सुरू

**मुंबई : हॅलो प्रभात**




डॉ. एल.एच. हिरानंदानी हॉस्पिटल, पवई आणि रेड हेल्थ यांच्या संयुक्त विद्यमाने मध्य मुंबईत पहिली ५जी–सक्षम ॲडवान्स्ड लाइफ सपोर्ट (एएलएस)रूग्णवाहिकासेवासुरू करण्यात आली आहे. मुंबईच्या आपत्कालीन आरोग्यसेवेतील महत्वपूर्ण सेवेचे उदघाटन श्री प्रदीप चव्हाण, पोलिस उपायुक्त, मुंबई (वाहतूक पूर्व विभाग) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रेड हेल्थचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. प्रभदीप सिंग, डॉ. एल.एच. हिरानंदानी हॉस्पिटलचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. समीर कुलकर्णी आणि हॉस्पिटलचे वरिष्ठ प्रतिनिधी उपस्थित होते.

ही क्रांतिकारी ५ऋ–सक्षम रुग्णवाहिका सेवा आपत्कालीन वैद्यकीय प्रतिसाद तंत्रज्ञानामध्ये एक महत्त्वपूर्ण झेप आहे, जी मध्य मुंबईला पुढील पिढीच्या आरोग्यसेवा वितरणाच्या अग्रस्थानी नेते. या रुग्णवाहिकेत अत्याधुनिक ५जी कनेक्टिव्हिटीचा वापर केला जातो.

ज्यामुळे रिअल–टाइम वैद्यकीय डेटा ट्रान्समिशन, रिमोट तज्ञ सल्लामसलत आणि आपत्कालीन प्रतिसाद पथके व रुग्णालय सुविधांमध्ये विनासायास समन्वय शक्य होते.

## जसलोक हॉस्पिटलमध्ये नेतृत्वात बदल

### विनोद पी.चनराय यांची अध्यक्षपदी नियुक्ती

**मुंबई : हॅलो प्रभात**

जसलोक हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर या मुंबईमधील आघाडीच्या मल्टी–स्पेशलिटी चतुर्थक केअर हॉस्पिटलला महत्त्वपूर्ण नेतृत्व परिवर्तनाची घोषणा करताना आनंद होत आहे. अध्यक्ष म्हणून सेवा वाहिलेल्या श्रीमती कांता मसंद आता चेअरपरसन एमेरिटसची मानक भूमिका सांभाळतील. जसलोक समुदायामध्ये दीर्घकाळापासून विश्वस्त आणि प्रमुख व्यक्ती असलेले श्री. विनोद पी. चनराय



यांनी अध्यक्षपद स्वीकारले आहे.

श्रीमती मसंद यांच्या नेतृत्वाखाली जसलोक हॉस्पिटलने क्लिनिकल सेवा, पायाभूत सुविधा आणि समुदाय पोहोचण्यामध्ये अपवादात्मक वाढ केली आहे. रुग्णांना प्रथम स्थान देण्याची त्यांची दृढ भावना आणि हॉस्पिटलच्या स्थापनेच्या ध्येयाप्रती त्यांची कटिबद्धता यातून त्यांचा कार्यकाळ निश्चित झाला आहे.

कोविड–१९ साथीच्या काळात जसलोक ॲनेक्सची स्थापना आणि त्यांच्या सीएसआर उपक्रमांतर्गत मुंबईतील खाजगी हॉस्पिटल्समध्ये सर्वाधिक संख्येने कोविड–१९ लसीकरण करणे हे उल्लेखनीय टप्पे आहेत. बाल आशा अनाथाश्रमातील त्यांच्या कटिबद्धतेमधून सामाजिक जबाबदारीप्रती त्यांचा पाठिंबा दिसून येतो.

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली – ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात**, कार्यालय, ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली– ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.

■ **सांगली मुख्य कार्यालय :** ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ **पुणे कार्यालय :** १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे–४११०३०

■ **सांगली शहर संपर्क : ९०२१६५१९७६** ■ **कोल्हापूर कार्यालय :** एस ९४६, GF–७, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर–४१६००२

■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)

■ व्यवस्थापकीय संपादक : संजय भिडे ■ सल्लागार संपादक : संजीव शाळगावकर ■ मुख्य संपादक : गणेश पाटील–सावर्डेकर

## आयजीएमच्या समस्यांबाबत सोमवारी बैठक

**इचलकरंजी : हॅलो प्रभात**

गोरगरीब सर्वसामान्यांसाठी आधारवड असलेल्या आयजीएम रुग्णालयातील दीर्घकालीन समस्या, अपुर कर्मचारी वर्ग, आवश्यक सुविधा, रुग्णसेवेतीवल अडचणी आदी विविध विषयांवर ठोस निर्णय करण्यासाठी राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली १४ जुलै रोजी मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती आ. राहुल आवाडे यांनी दिली.

# संमिश्र

## माडग्याळ येथे वाहतुकीचा खेळ खंडोबा



**जत : हॅलो प्रभात**

माडग्याळ येथे गेल्या साठ ते पासष्ट वर्षांहून अधिक काळ दर शुक्रवारी माडग्याळ येथे शेळ्या-मेंढ्यांचा बाजार भरतो. तो राज्यभरात प्रसिद्ध आहे. या बाजारात पंचक्रोशीतील माडग्याळी शेळ्या मेंढ्या विक्रीला येतात. खरेदीसाठी कोकण, गोवा, कोल्हापूर, खेड व पुणे या भागातून माडग्याळी शेळी - मेंढीला मोठ्या प्रमाणात मागणी आहे. त्यामुळे या भागातील व्यापारीही बाजारात दृष्टीस पडतात.माडग्याळ हे माडग्याळी मटकी, हुलगे, बोरे यासाठी सुद्धा प्रसिद्ध आहे. माडग्याळी शेळी - मेंढीला जी -आय नामांकन मिळविण्याचे अनेक राजकीय नेते प्रयत्न करत असतात. ज्या गावाला बाजाराची साठ ते पासष्ट वर्षांची परंपरा आहे. त्या गावाच्या वाहतुकीचा प्रश्न अजूनही तसाच आहे. अरुंद रस्ता, वाहतुकीचे ढसाळ नियोजन, रस्त्यावर बसणारे विक्रेते यामुळे बाहेरून येणाऱ्या- जाणाऱ्या प्रवाशांना तासंतास ट्रॅफिक मध्ये अडकून पडावे लागत आहे. विशेषतः आठवडा बाजारासाठी कर आकारणी करणारी ग्रामपंचायत व माडग्याळ पोलीस सुद्धा याकडे डोळेझाक करत आहेत. यामुळे नागरिक, व्यापारी, प्रवाशी यांच्याकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

## वाय.के.जाधव यांच्या पुण्यस्मरणानिमित्त दूरदर्शन संच भेट



**कोतोली : हॅलो प्रभात**

वाय. के. जाधव यांच्या चतुर्थ पुण्यस्मरण दिनानिमित्त, येथील जय ज्योतिर्लिंग हायस्कूलला दूरदर्शन संच भेट देण्यात आला. या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरणारी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. शाळेतील गरज ओळखून विद्यार्थ्यांना सदरचे उपक्रम .जाधव यांच्या स्मृतिदिनानिमित्त देऊन सामाजिक बांधिलकी जपली असल्याचे श्रीमती जाधव यांनी सांगितले.याप्रसंगी माजी चेअरमन श्रीमती विजया जाधव, युवा नेते साहिल जाधव, मुख्याध्यापक अरुण काळे, तसेच शाळेतील शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक उपक्रम ांबरोबरच समाजाप्रती संवेदनशीलतेची जाणीव निर्माण होईल, असे उपस्थितांनी मत व्यक्त केले.

## गुरुपौर्णिमेनिमित्त अनोखा उपक्रम



**कडेगाव : हॅलो प्रभात**

नेर्ली (ता.कडेगाव) येथील श्री दत्त उपासना मंडळ यांच्या तर्फे प.पु.श्री.मोहन जनार्दन जोशी(काका)यांचे स्मरणार्थ गुरुपौर्णिमेचे औचित्य साधुन जिल्हा परिषद शाळा येथे इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना स्पोर्टस् कीट(पुर्ण ड्रेस)चे वाटप करण्यात आले.याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री धनंजय नरुले सर,शिक्षिका श्रीमती जयश्री मुरकूटे,सौ.पुजा पोतदार,गटसाधन केंद्राच्या विषय तज्ञ सौ संगीता माने, जिल्हा परिषद उर्दू शाळा नेर्ली चे मुख्याध्यापक एहसान उलहक सय्यद,पनवेल येथील प्रख्यात डॉ. उल्हास मारुलकर,सौ.अवंतिका मारुलकर,राजेंद्र सावंत,सौ.दिपाली सुर्यवंशी,बाळासाहेब पवार,मकरंद घाटे,आनंदा सुर्यवंशी,विवेकानंद कुंभार यांसह स्थानिक नागरीक उपस्थित होते.

## डॉ.कदम महाविद्यालयाचे क्रीडा स्पर्धेत यश



**सांगली : हॅलो प्रभात**

जत येथे पार पडलेल्या १६ व्या राज्यस्तरीय कॅनो-स्प्रिंट व ड्रॅगन बोट खुल्या स्पर्धेत महाविद्यालयाचे विद्यार्थी कु. पार्थ एकनाथ कोळी व कु. श्रावणी रामचंद्र पाटील यांनी ड्रॅगन बोट या क्रीडा प्रकारात रौप्य पदक मिळवून महाविद्यालयाचे नावलौकिक वाढविले. त्यांच्या या कामगिरीबद्दल महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. एस. व्ही. पोरे यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले. महाराष्ट्रातील ही एक प्रतिष्ठित स्पर्धा म्हणून ओळखली जाते. या स्पर्धेत महाराष्ट्रातील अनेक खेळाडूंनी आपला सहभाग नोंदविला होता. महाविद्यालयातील यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यासाठी या वेळी उपप्राचार्य डॉ. ए. आर. सुपले, ज्युनियर विभाग प्रमुख प्रा. ए. एल. जाधव, डॉ. डी. पी. नाडे, ए. बी. खडतरे, प्रा. आर. एस. काटकर, एस. डी. पाकले, एस. बी. पाटील, डॉ. एस.आर. जाधव, डॉ. एम. व्ही. साळुंखे व ओ. एस.चव्हाण इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# कर्मवीर पतसंस्थेची ३८ वी वार्षिक सभा उत्साहात संपन्न

## १५% ने लाभांष जाहीर



**सांगली : हॅलो प्रभात**

कर्मवीर भाऊराव पाटील नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित सांगली ची सन २०२४- २०२५ सालची ३८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच संपन्न झाली. आर्थिक वर्ष २०२४-२०२५ साठी सभासदांना १५ % ने लाभां देणार असल्याची घोषणा संस्थेचे चेअरमन रावसाहेब पाटील यांनी केली.सभेची सुरुवात संस्थेचे श्रध्दास्थान कर्मवीर भाऊराव पाटील व स्व. डॉ. आप्पासाहेब चोपडे यांचे प्रतिमा पुजन व दिप प्रज्वलनाने झाली.

सभेचे स्वागत प्रास्ताविक संस्थेचे चेअरमन पाटील यांनी केले. पतसंस्थेने सभासदांच्या विश्वासावर चांगली कामगिरी नोंदविली आहे त्याचे श्रेय सभासद संचालक सेवक यांच्या सांघिक कार्यास दिले व सभासदांना मनपुर्वक धन्यवाद दिले. संस्थेच्या भक्कम आर्थिक स्थितीचा सविस्तर आढावा त्यांनी सभासदांसमोर जाहिर केला. संस्थेची प्रगती उल्लेखनिय असून जादा तरतुदीमुळे संस्थेचा ताळेबंद मजवुत झाला आहे असे त्यांनी सांगितले. सभासदांनी संस्थेवर आजवर केलेल्या प्रेमाबद्दल त्यांनी सभासदांना धन्यवाद दिले. यापुढेही सभासदांनी संस्थेच्या कार्यास पाठवळ देण्याचे आवाहन रावसाहेब पाटील यांनी केले.

सभेच्या विषय पत्रिकेचे वाचन मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल मगदुम यांनी केले. सर्व विषय सभासदांनी एक मताने मंजूर केले.सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली.सभेस व्हाईस चेअरमन डॉ. अशोक सकळे, अॅड. एस.पी. मगदुम, डॉ. रमेश ढबू, श्री. ओ. के. चौगुले (नाना), डॉ. एस.बी. पाटील (मोटके) डॉ. चेतन आप्पासाहेब पाटील संचालिका श्रीमती भारती चोपडे, चंदन केटकाळे, तज्ञ संचालक डॉ. नरेंद्र खाडे, लालासो थोटे,बजरंग माळी, आप्पासो गवळी उपस्थित होते. आभार संचालक वसंतराव नवले यांनी मानले सुत्रसंचलन संजय सासणे यांनी केले.

## राजीव गांधी योजनेची आर्थिक मदत वाढीव अन्य वेळेत द्या : आ. विश्वजीत कदम यांची मागणी

**मुंबई : हॅलो प्रभात**

दुधोंडी महाराष्ट्र विधानमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात सत्ताधाऱ्यांना विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर जाब विचारताना आमदार डॉ. विश्वजीत उर्फ बाळासाहेब कदम यांनी स्पष्ट शब्दांत आपली भूमिका मांडली. राजीव गांधी विद्यार्थी सानुग्रह अनुदान योजनेतून लाभार्थी विद्यार्थ्यांना वेळेवर आणि वाढीव आर्थिक मदत मिळावी यासाठी त्यांनी सरकारकडून ठोस निर्णयाची मागणी केली.

सदर योजनेत अनेक विद्यार्थ्यांचे अपघाती मृत्यू झाल्यानंतरही संबंधित कुटुंबांना अद्याप ४४ लाखांचा प्रलंबित अनुदान मिळालेले नाही, याकडे लक्ष वेधत डॉ. कदम म्हणाले की, अनाथ झालेल्या पालकांना तातडीने आर्थिक मदत मिळाली पाहिजे.

हे अनुदान लवकरात लवकर वितरित करावे. तसेच, वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर सद्यस्थितीत उपलब्ध असलेली ५ लाखांची मदत अपुरी आहे. ती १० लाखांपर्यंत वाढवावी, अशी ठोस मागणी त्यांनी केली. ग्रामीण भागातील गरीब, वंचित आणि दुर्बल गटातील मुलांपर्यंत या योजनेचा लाभ पोहोचावा, यासाठी डॉ. कदम यांनी आणखी एक महत्त्वाचा मुद्दा अधिवेशनात मांडला. अंगणवाडीतील लहान मुले आणि ज्युनिअर कॉलेजमध्ये शिकणारे विद्यार्थी हे देखील अनेकदा दुर्दैवी अपघातांना बळी पडतात.

त्यामुळे त्यांनाही या योजनेचा समावेश करून संरक्षण द्यावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. सरकारने या योजनेचे कवच विस्तारित करणे ही काळाची गरज आहे. शिक्षण क्षेत्रात प्रगती साधायची असेल, तर गरीब विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या कुटुंबांना आधार देणाऱ्या योजना अधिक परिणामकारक आणि पारदर्शक असाव्यात, असे स्पष्ट मत डॉ. कदम यांनी व्यक्त केले.डॉ. कदम यांच्या या मागण्यांमुळे शासनाचे लक्ष या दुर्लक्षित मुद्द्याकडे वळले असून, पुढील काळात सरकारने याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा विद्यार्थ्यांच्या पालकांनी व्यक्त केली आहे.

## संजीवनीच्या चार विद्यार्थ्यांची नोकरीसाठी निवड



**कोपरगांव : हॅलो प्रभात**

येथील संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजचा ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग विविध बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या संपर्कात राहुन आपल्या विद्यार्थ्यांकडून कंपन्यांच्या गरजेनुसार म ुलाखतींची तयारी करून घेतो. अशाच प्रयत्नातुन रिलायन्स इंडस्ट्रिज प्रा. लि. कंपनीचा कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले होते. यात अंतिम वर्षातील चार विद्यार्थ्यांची लाखोंच्या वार्षिक पॅकेजवर कंपनीने नोकरीसाठी निवड केली आहे,

अशी माहिती संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या अधिकृत सुत्रांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

पत्रकात पुढे म्हटले आहे, रिलायन्स कंपनीने निवड केलेल्या विद्यार्थ्यांमध्ये मेकॅनिकल इंजिनिअरंगच्या विक्रम जालिंदर जगताप, शेखर सुदाम गायकवाड व इलेक्ट्रिकल इंजिनिअरींगच्या स्वप्नील दिनकर अनप आणि विशाल दत्तात्रय पुंड यांचा समावेश आहे. रिलायन्स कंपनी कडून चांगले वार्षिक पॅकेज मिळणार या अनुषंगाने ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाने आपल्या विद्यार्थ्यांकडून मुलाखतींचा भरपुर सराव करून घेतला. यात कंपनीने गरजेनुसार चार नवोदित अभियंत्यांची निवड केली. कंपनीने नोकरीचे ठिकाण कळविताच चारही नवोदित अभियंते रिलायन्सच्या सेवेत रूजु होतील.

## डीकेटीई व आयआयआयटी यांच्यात शैक्षणिक सामंजस्य करार



**इचलकरंजी : हॅलो प्रभात**

डीकेटीईचे टेक्स्टाईल ऍण्ड इंजिनिअरींग इन्स्टिटयूट आणि इंडियन इन्स्टिटयूट ऑफ इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी,धारवाड यांच्यात शैक्षणिक व संशोधन सहकार्याबाबत महत्त्वपूर्ण करार झाला आहे.या करारामुळे उच्च दर्जाचे शैक्षणिक उपक्रम राबवले जाणार आहेत. जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांचा विकास,संशोधनाची गती आणि विद्यार्थ्यांची गुणवत्ता यामध्ये लक्षणीय वाढ व्हावी हा या करारामागचा उददेश आहे. डीकेटीईने यापूर्वीही अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अग्रगण्य संस्थाशी करार केले असून, आयआयआयटीसारख्या नामवंत संस्थेशी झालेला हा करार संस्थेच्या शैक्षणिक उंचीचा पुढचा टप्पा आहे.या कराराअंतर्गत डीकेटीईचे विद्यार्थी आयआयआयटी धारवाडमध्ये शिक्षण घेवून मिळवलेले क्रेडिट डीकेटीईच्या क्रेडिटमध्ये ऍड होणार आहेत तसेच मायनर कोर्सेचा देखील उल्लेख असून विद्यार्थ्यांची, प्राध्यपकांची वसंशोधकांची देवाणघेवाण, अल्पकालीन अभ्यासक्रम,संशोधन व विकास कार्यक्रम राबवले जाणार आहेत.याशिवाय संयुक्तपणे पेटेन्ट तयार करणे,संशोधनलेख आंतरराष्ट्रीय जर्नलस्मध्ये प्रसिध्द करणे,विद्यार्थी व शिक्षकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजीत करणे,रिसर्च यासह संयुक्तरीत्या अनेक उपक्रम राबविले जाण्यासंबंधी करारात समावेश आहे.यामुळे आयआयआयटी येथील तंत्रज्ञानाचा लाभ डीकेटीईमध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी आणि प्राध्यापक यांना होणार आहे. यावेळी आयआयआयटीचे डायरेक्टर प्रा.एस.आर.महादेवा प्रसन्ना यांनी डीकेटीईचे कार्य याबद्दल कौतुकास्पद उद्गार काढले. संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे,माजी मंत्री प्रकाश आवाडे, मानद सचिव डॉ. सौ.सपना आवाडे, कार्यकारी संचालक रवी आवाडे व सर्व ट्रस्टी यांचे करारासाठी मार्गर्शन मिळाले.

## अनंतराव पवार अभियांत्रिकीत गुरुपौर्णिमा उत्साहात



**पुणे : हॅलो प्रभात**

अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च पर्वती पुणे महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. महर्षी व्यास मुनींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्याक्रामची सुरवात झाली. या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी स्वयंसेवक कु.मयुरी कोंढाळकर हिने आपल्या मनोगतामध्ये गुरु प्रती कृतज्ञता व्यक्त करून आपल्या जीवनातील गुरूंचे महत्व विषद केले. गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून महाविद्यालयातील प्राध्यापकांना गुलाब पुष्प देऊन गौरविण्यात आले. सदर कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ.सुनील ठाकरे, अंतर्गत गुणवत्ता कक्षाचे समन्वयक प्रा.गणेश कोंढाळकर, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. आकाश दोडके सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते. या कार्याक्रनाचे सूत्रसंचालन कु, ईश्वरी भोर हिने केले. अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या सरचिटणीस मा.सौ. प्रमिला गायकवाड यांनी महाविद्यालयाने हा उपक्रम राबविल्या बद्दल सर्वांचे अभिनंदन केले.

## साई मंदिरात गुरुपौर्णिमा उत्साहात संपन्न



**सांगली : हॅलो प्रभात**

हरीपूर रोड काळीवाट येथील साई मंदिरात गरुपौर्णिमेनिमित्त पारायण, महाआरतीसह विविध धार्मिक उपक्रम उत्साहात पार पडले. यावेळी भाजपनेत्या जयश्रीताई पाटील यांच्याहस्ते आरती करण्यात आली. याप्रसंगी महिलांसह भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे संमोहनतज्ज्ञ डॉ. अजितकुमार यांच्यासह मंदिर समितीने कार्यक्रमांचे मोठ्या प्रमाणात नियोजन केले होते.

शिर्डी येथील साई मंदिराच्या धर्तीवर डॉ. अजित कुमार यांनी स्व:खर्चाने या साई मंदिराची उभारणी करण्यात आली आहे. येथे कोणत्याही प्रकारची देणगी न स्वीकारता स्व:खर्चाने सर्व व्यवस्था केली जाते. गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने गेल्या आठवडाभरापासून महिलांचे साई पारायण सुरू होते. तसेच विविध धार्मिक विधी पार पडले. त्यांची आज समाप्ती करण्यात आली.

गुरुपौर्णिमेला मंदिरात भव्य सजावट करण्यात आली होती. संपूर्ण परिसर रांगोळीने तसेच फुलांनी सजविण्यात आला होता. सकाळपासून मंत्रोचार पार पडले. मंदिरात महापूजा आणि सायंकाळी महाआरती करण्यात आली. यावेळी अनेक महिलांनी ५१ दिव्यांच्या निरांजनासह आरतीत सहभाग घेतला.

# विश्वराज हॉस्पिटलमध्ये गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वी



**दौंड : हॅलो प्रभात**

लोणी काळभोर (ता. हवेली) येथील योगेश शिंदे (वय-वर्षे १८) याच्यावर ट्रान्सकॅथेटर फॉन्टन कम्प्लिशन शस्त्रक्रिया यशस्वी आणि विनाचिरफाड न करता नि: शुल्क करण्यात आली. ही शस्त्रक्रिया अत्यंत गुंतागुंतीची वैद्यकीय प्रक्रिया असल्याचे विश्वराज हॉस्पिटलचे बालहृदयरोगतज्ज्ञ डॉ. आशिषकुमार बनपुरकर यांनी सांगितले. योगेश शिंदे याला जन्मजात हृदयविकाराचा त्रास असून त्यात ट्रायकसपिड, अॅट्रेशिया, डबल आउटलेट राईट व्हेंट्रिकल, व्हेंट्रिक्युलर सेप्टल डिफेक्ट आणि पल्मोनरी स्टेनोसिस यांचा समावेश होता. यासाठी २०१८ मध्ये त्याच्यावर बायडायरेक्शन ग्लेन शंट व फॉन्टन प्रिपरेशन शस्त्रक्रिया करण्यात आली होती. परंतु त्याच्या आरोग्यस्थितीत सुधारणा न झाल्यामुळे अलीकडेच विश्वराज हॉस्पिटलमध्ये विशेष कॅथेटर आधारित तंत्र वापरून तिसऱ्या टप्प्यातील शस्त्रक्रिया करण्यात आली. डॉ . बनपुरकर यांनी सांगितले की या शस्त्रक्रियेमुळे योगेशच्या ऑक्सिजन सॅच्युरेशनमध्ये लक्षणीय वाढ झाली असून ती ९६ टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. यामुळे रुग्णाची शारीरिक कार्यक्षमता देखील सुधारली आहे. शस्त्रक्रियेत डॉ. आशिषकुमार बनपुरकर, यांच्यासह सहाय्यक वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन कातकडे, डॉ. सुजितकुमार, डॉ. सूरज इंगोले, डॉ. चंद्रकांत सहारे, डॉ. विजय खंडाळे आणि डॉ. विठ्ठल शेंडगे यांची उपस्थिती होती. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार कॅथेटर आधारित ही प्रक्रिया पारंपरिक शस्त्रक्रियेच्या तुलनेत रुग्णासाठी कमी धोका आणि लवकर बरे होण्यास उपयुक्त आहे.

# निवडणूक डोळ्यासमोर ठेवून केलेला हा बदनामीचा डाव : ॲड. सदाशिवराव पाटील



## सदाभाऊ पाटील यांनी केला बाबर गटावर हल्लाबोल

**विटा : हॅलो प्रभात**

आगामी विटा नगरपालिकेची निवडणूक माझ्या नेतृत्वाखाली लढवली जाणार आहे. त्यामुळे माझे चारित्र्यहनन करून राजकीय पोळी भाजून घेण्याचा विरोधकांचा हा प्रयत्न आहे. केवळ विटा पालिकेची निवडणूक डोळ्यांसमोर ठेवून केवळ माझ्या बदनामीसाठीच हा कुटील डाव मांडला आहे, अशा शब्दांत श्री नाथाष्टमी यात्रा कमिटीचे अध्यक्ष माजी आमदार ड. सदाशिवराव पाटील यांनी रणजीत पाटील यांच्यासह विरोधकांनी केलेल्या आरोपांचे खंडन करत विरोधकांवर तोफ डागली.

येथील भैरवनाथ यात्रा कमिटीच्या जागेबाबत सामाजिक कार्यकर्ते रणजीत पाटील आणि नगरसेवक अमर शितोळे यांनी सहकाऱ्यांसह बेमुदत धरणे आंदोलन केले होते.

त्यावेळी त्यांनी काही प्रश्नही उपस्थित केले होते. त्यावर आज यात्रा कमिटीचे अध्यक्ष माजी आमदार सदाशिवराव पाटील यांनी स्वतः आणि यात्रा कमिटीवर केलेले सर्व आरोप फेटाळून लावले.

यावेळी यात्रा कमिटीचे सचिव आप्पा पाटील, शरद पाटील, किरण तारळेकर, सचिन शितोळे, विश्वनाथ कांबळे, सुभाष भिंगारदेवे, संजय सपकाळ, प्रकाश गायकवाड, रवींद्र कदम, एकनाथ गडदरे, पांडुरंग पवार, भगवान पाटील यांच्यासह यात्रा कमिटीचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

## पोलीस काका आणि पोलीस दीदी संकल्पना राबविणार

**सांगली : हॅलो प्रभात**

अल्पवयीन मुलींचे अपहरण, छेडछाड आदि घटना वाढल्या आहेत. त्याला प्रतिबंध घालण्यासाठी पोलीस काका आणि पोलीस दीदी अशी संकल्पना राबविणार आहोत. त्याचबरोबर शाळा, महाविद्यालयात प्रबोधन करण्यात येणार असल्याची माहिती पोलीस अधिक्षक संदीप घुगे यांनी गुरुवारी पत्रकार बैठकीत दिली. गावागावातील तंटे जागेवर सुटण्यासाठी तंटामुक्त समितीचे पुर्नगठण केले जाईल, असेही ते म्हणाले.

अधीक्षक घुगे म्हणाले, जिल्ह्यात अल्पवयीन मुलींच्या अपहरणाच्या घटना वाढल्या आहेत. छेडछाड, विनयभंगही होत आहेत. आटपाडी येथे टोळक्याच्या त्रासाला कंटाळून मुलीने आत्म हत्या केली तर तासगावमध्ये मुलीचा पाठलाग करण्यात आला. याप्रकरणी संशयितांवर गुन्हे दाखल केले आहेत. शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थिनीचे प्रबोधन, समुपदेशन करण्यासाठी पोलिस काका, पोलिस दीदी संकल्पना राबविणार आहोत. पोलिस

अंमलदार प्रत्येक शाळा, महाविद्यालयांना वारंवार भेटी देतील. तिथे मुलींचे प्रबोधन केले जाईल.



**संदीप घुगे यांची पत्रकार परिषदेत माहिती**

जिल्ह्यात खूनांच्या घटना वाढल्या असल्याची कबुली देतांना घुगे म्हणाले, ६ महिन्यात ३८ खून झाले आहेत. त्यापैकी ३० खून वैयक्तिक कारणातून झाले. कौटूबिंक वाद, घरगुती भांडणातून खूनाच्या घटना घडत आहेत. अशा गंभीर घटना घडू नये, यासाठी पोलिस पाटील यांची मदत घेतली जाणार आहे.

घरातील भांडणे, जमिनीचे वाद याचे पर्यावसन गंभीर गुन्ह्यात होऊ शकते, याची माहिती पोलिस पाटील यांच्याकडून घेतली जाईल. प्रसंगी प्रतिबंधात्मक कारवाईही केली जाणार आहे. गावागावातील तंटे मिटावेत, यासाठी तंटामुक्त समितीही कार्यक्षम करीत आहोत. त्याच्याही नियमित बैठका होतील, असेही घुगे यांनी स्पष्ट केले.

## संक्षिप्त...



### मासाळवाडीत देशी खिल्लार गोशाळेचे उद्घाटन संपन्न

**आटपाडी : पांडुरंग हातेकर**

मासाळवाडी येथे सच्चीदानंद संत श्रीपाद बाबांच्या कृपा आशीर्वादाने गुरुवर्य ह.भ.प. श्री पुरुषोत्तम रायजाधव सर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मासाळवाडी ग्रामस्थ व साधक बंधू-भगिनी यांच्या सहकार्यातून आषाढी एकादशीच्या पर्वकाळात ४ जुलै ते ७ जुलै या कालवाधित भव्य दिव्य वैष्णव आनंद मेळावा भक्तिमय आनंदात पार पडला. यामध्ये महाराष्ट्र राज्यातील विविध भागातून अनेक वैष्णवांच्या दिंड्या सामील झाल्या. आषाढी एकादशीच्या निमित्ताने विश्वात्मके देवे देशी खिल्लार गोशाळेचा उदघाटन सोहळा पार पडला. या सोहळ्यासाठी धर्म मंडपामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष, युवा उद्योजक मा. विनायकरावजी मासाळ साहेब यांनी उपस्थिती लावली व आपले मनोगत व्यक्त केले. गोमातेची सेवा आपल्याकडूनही घडावी व या धर्म कार्यात आपलाही ना काही खारीचा वाटा असावा याची जाणीव ठेऊन, धर्माच्या कार्याला आपलीही राजधर्माची साथ असावी,या प्रेरणेतून गोशाळेसाठी स्वेच्छेने पाच लाख रुपये दान म्हणून दिले व उपस्थित सर्व साधू-संत मंडळींचे दर्शन व आशीर्वाद घेतला. तसेच मासाळवाडीचे सुपुत्र व कार्यकारी अभियंता अधिकारी पदी कार्यरत मा. दादासाहेब दाईंगडे साहेब यांनीही आपले दोन एकर क्षेत्र स्वेच्छेने गोशाळेसाठी दान केले. या आषाढीच्या पर्वकाळात अनेक क्षेत्रातील मान्यवरांनी या भक्तिमय वातावरणात आपली उपस्थिती लावली व विविध प्रकारे सेवाभावाने कार्य करून हा वैष्णव मेळावा आनंदात पार पडला.

### महापोर्टलचे कामकाज त्वरित सुरळीत करावे : आ. बाबर



**विटा : हॅलो प्रभात**

राज्यातील महाऑनलाईन पोर्टल सुरळीत कार्यरत नसल्याने नागरिकांना आणि विद्यार्थ्यांना गंभीर अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर आ. सुहास बाबर यांनी विधानसभेत पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या माध्यमातून हा मुद्दा सभागृहात मांडला. सध्या राज्यात उच्च शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. तहसील कार्यालयांमध्ये डोमिसाईल, नॉन-क्रिमिलियर, जात प्रमाणपत्र आणि उत्पन्नाचा दाखला मिळवताना विद्यार्थ्यांना मोठ्या अडथळ्यांना सामोरे जावे लागत आहे. यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे प्रवेश अडकण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या मुद्यावर उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सकारात्मक भूमिका घेत नुसत्या टोकनवर देखील विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल, अशी ग्वाही सभागृहात दिली. आ.बाबर यांनी यावेळी प्रशासनाने उपाययोजना करून विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये, याची दक्षता घेण्याची सुद्धा मागणी केली.

### बोरगाव हायस्कूलचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**बोरगाव : हॅलो प्रभात**

बोरगाव (ता.वाळवा) येथील बोरगाव हायस्कूल बोरगावच्या विद्यार्थ्यांनी



वरदराज वाकसे



श्रेयश भोसले

शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळविले. वरदराज उत्तम वाकसे याने इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत सांगली जिल्ह्यात २३६ वा क्रमांक पटकावला तर श्रेयश सचिन भोसले याने इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत सांगली जिल्ह्यात १०२ वा क्रमांक पटकावला यशस्वी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक श्रीमती एस.एस. माने, शिष्यवृत्ती विभाग प्रमुख पी.डी. माने, के. एन. पटेल, दत्तात्रय फसाले महेश सुतार,डी. आय. चौधरी, आशा देवकुळे, वासंती कांबळे विनय देसाई यांचे मार्गदर्शन लाभले. शिक्षण प्रसारक संस्था बोरगावचे अध्यक्ष विष्णुपंत शिंदे उपाध्यक्ष उदयसिंह पाटील सचिव एस.टी. पाटील शाळा समिती अध्यक्ष संजय पाटील व सर्व संचालकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### डांगे आयुर्वेद महाविद्यालयत समर इंटर्नशीप

**आष्टा : हॅलो प्रभात**

अण्णासाहेब डांगे आयुर्वेद वैद्यक महाविद्यालय येथे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांचा समर इंटर्नशीप प्रोग्राम आयोजित करण्यात आला. सदर प्रोग्राममध्ये न्यूट्रिशन व इसीजी हे दोन प्रमाणपत्र कोर्स पूर्ण करण्यात आले. यासाठी महाराष्ट्रातून विविध वैद्यकीय विद्याशाखेचे विद्यार्थी- विद्यार्थिनी सहभागी झाले होते. यामध्ये एमबीबीएस, बीडीएस, बीएएमएस, बीएचएमएस, फिजिओथेरपी असे एकूण ३३ विद्यार्थी- विद्यार्थिनी यांनी कोर्स पूर्ण केले. डॉ. सूरज कुंडले यांनी न्यूट्रिशन कोर्स व डॉ. सुशांत कणसे यांनी इसीजी बेसिक कोर्स याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रशासकीय अधिकारी व उपप्राचार्य डॉ. विजय डांगे यांनी नोडल ऑफिसर म्हणून कामकाज पाहिले. शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. अण्णासाहेब डांगे यांच्या प्रेरणेने व सचिव ड. चिमण डांगे, उपसचिव विश्वनाथ डांगे यांचे मार्गदर्शनाखाली उपक्रम संपन्न झाला. प्राचार्य डॉ. पराग देशमुखे, उपप्राचार्य डॉ. विजय डांगे , उपप्राचार्य डॉ. जयवंत खरात यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही मनोगत व्यक्त केले.

## विद्यार्थ्यांनी ज्ञानार्थी बनत सद्गुणांची जोपासना करावी : ह.भ.प.संतोष अंगापूरकर

### आदर्श गुरुकुल पेठ वडगाव येथे गुरुपौर्णिमा उत्साहात

**पेठवडगांव : हॅलो प्रभात**

शाळेतील ज्ञानाबरोबर जगाच्या शाळेत आम्ही ज्ञान प्राप्ती केली का? हे महत्त्वाचं आहे.यासाठी भगवंताने दिलेल्या कलेचा वापर करून आपलं वेगळेपण सिद्ध करावं. सद्गुरूंच्या विचाराप्रमाणे अंतरंगात ज्ञान प्राप्तीसाठी प्रयत्न करावा. विद्यार्थ्यांनी केवळ परीक्षार्थी बनण्यापेक्षा विद्यार्थ्यांनी ज्ञानार्थी बनत सदगुणांची जोपासना करावी असे प्रतिपादन प्रमुख मार्गदर्शक वक्ते ह.भ.प.संतोष अंगापूरकर यांनी व्यक्त केले. ते आदर्श गुरुकुल अकॅडमी पेठ वडगाव वतीने गुरुपौर्णिमा व गुरुजनांचे पाद्यपूजन या कार्यक्रमात बोलत होते.



ह.भ.प.संतोष अंगापूरकर पुढे म्हणाले की विद्यार्थ्यांच्या हृदयात उतरणारा हा गुरू असतो. जीवन जगण्याची कला ही विद्यार्थी गुरु कडून घेत असतो. पॅकेज देणारे शिक्षण नको तर जीवनानंद देणारे शिक्षण आवश्यक आहे.यावेळी विद्यालयात सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुजनांचे पाद्यपूजन करून गुरुपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ डी एस घुगरे, मुख्याध्यापिका सौ एम डी घुगरे, आंबप चे माजी केंद्रप्रमुख अशोक पाटोळे,ग्रीन व्हॅली चे मुख्याध्यापक व्हि.एस डोईजड, पर्यवेक्षक एस जी जाधव, प्रशासक एस ए पाटील, एम एच चौगुले, सौ एस एस गिरिगोसावी तसेच सर्व शिक्षक बंधू-भगिनी आणि विद्यार्थी - विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भाजपच्या राज्य परिषदेवर जिल्ह्यातील अकरा जणांची वर्णी

**सांगली : हॅलो प्रभात**

भाजपने राज्य परिषदेवरील सदस्यांची नियुक्ती जाहीर केली आहे. यामध्ये मकरंद देशपांडे, माजी आ. दिनकर पाटील, प्रकाश बिरजे, मिलिंद कोरे यांच्यासह जिल्ह्यातील विविध तालुक्यातील कार्यकर्त्यांना संधी देण्यात आली आहे. २०२५ ते २०२८ पर्यंतच्या कालावधीसाठी ही निवड आहे.

यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह राज्यातील भाजपचे अनेक मंत्री, आमदार, खासदार यांचा समावेश आहे.

शिवाय पक्षातील जुन्या, ज्येष्ठ कार्यकर्त्यांनाही या परिषदेवर संधी देण्यात आली आहे. राज्यातील ४५४ जणांना या परिषदेवर संधी देण्यात आली आहे. जिल्ह्यातील एकही आमदार त्यामध्ये नाही. जिल्ह्यातून पश्चिम महाराष्ट्र संघटन मंत्री मकरंद देशपांडे, माजी आ. दिनकर पाटील, प्रकाश बिरजे, डॉ. रवींद्र आरळी, अनिल म. बाबर, राजाराम गरुड, महेश पाटील, स्वरूप पाटील, विलास काळेबाग, मिलिंद कोरे, अजित कांबळे यांचा राज्य परिषदेमध्ये समावेश आहे.

## कृषी शास्त्र अभ्यासक्रम लवकर सुरू करण्याची मागणी : आ.अरुण लाड

**कुंडल : हॅलो प्रभात**

विज्ञान विषयाच्या शिक्षकांनीच कृषी क्षेत्राचा अभ्यास घ्यावा. असे वित्त खात्याचे म्हणणे आहे. परंतु असे होता कामा नये.विज्ञान विषयाचा शिक्षक हा कृषी विषयाचे शिक्षण चांगल्या पद्धतीने शिकवू शकेलच असे नाही. शिवाय आज आपल्या महाराष्ट्रात हजारोंच्या संख्येने बी.एस.सी ॲग्रीचे पदवीधर आहेत. ज्यांना अध्याप नोकरी मिळाली नाही.

सुशिक्षित बेरोजगारांच्या यादीत असणाऱ्या अशांसाठी या निमित्ताने रोजगार निर्मिती होईल.आणि म्हणून





शालेय शिक्षणात कृषी अभ्यासक्रम लवकरात लवकर सुरू करण्यात यावा, तसेच हा अभ्यासक्रम घेण्यासाठी बी.एस.सी. ॲग्री ची पदवी घेतलेला शिक्षक नेमण्यात यावा. अशी मागणी यावेळी आमदार अरुण लाड यांनी केली.

दोन वर्षापूर्वी तत्कालीन कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांनी २५ एप्रिल २०२३ रोजी हा प्रस्ताव तत्कालीन शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांना दिलेला. त्यावेळीच्या शिक्षण मंत्र्यांनी स्वीकारला होता.त्यानंतर लगेच अभ्यासक्रमात कृषीचा समावेश करण्याबाबत तज्ञांची समिती नेमून कृषी अभ्यासक्रमाचा आराखडा निश्चित केला जाणार असल्याची घोषणा करण्यात आली. मात्र त्यासाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद गरजेची असल्याने वित्त विभागाची मंजुरी गरजेचे आहे.मात्र नवीन शिक्षक नेमण्यापेक्षा सध्या कार्यरत विज्ञान शिक्षका कडूनच कृषी विषयाचे ही अध्यापन करवून घ्यावे. असे मत वित्त विभागाने नोंदवले असल्याने आ.अरुण लाड यांनी सभागृहाचे लक्ष वेधत सरकार दरबारी ही मागणी केली.

## लोणी काळभोरच्या सरपंचपदी राहुल काळभोर

**लोणी काळभोर : हॅलो प्रभात**

पूर्व हवेलीतील नामांकित अशा लोणी काळभोर ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी राहुल दत्तात्रय काळभोर यांची ९ विरुद्ध ८ मतांनी निवड झाली आहे. राहुल काळभोर यांना ९ मते मिळाली.

सत्ताधारी गटाचे एक मत फुटल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे ग्रामपंचायतीमध्ये सत्ताधारी गटाला मिळालेली सत्ता गमवावी लागली आहे भरत दत्तात्रय काळभोर यांनी सरपंचपदाचा राजीनामा दिल्याने बुधवारी ही निवडणूक घेण्यात आली या निवडणुकीत नागेश काळभोर व राहुल काळभोर यांचा सरपंचपदासाठी प्रत्येकी एक-एक



अर्ज आला होता. उपस्थित १७ सदस्यांमध्ये गुप्त मतदान घेण्यात आले.

यात राहुल काळभोर यांना

**ग्रामपंचायतीवर प्रशांत काळभोर यांची पुन्हा सत्ता**

९ तर नागेश काळभोर यांना ८ मते मिळाली. त्यामुळे २०२१ मध्ये हातातून गेलेली सत्ता पुन्हा एकदा शेवटच्या सहा महिन्याने प्रशांत काळभोर त्यांच्या ताब्यात आणण्यात यश आले आहे.

## प्रतीक पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त रिल्स स्पर्धेचे आयोजन

**इस्लामपूर : हॅलो प्रभात**

राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष, प्रतीक पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रिल्स स्पर्धेचे आयोजन केले आहे. हे स्पर्धेचे दुसरे वर्ष आहे. वाळवा तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सोशल मीडियाच्यावतीने स्पर्धेचे संयोजन करण्यात येत आहे.



स्पर्धेतील प्रथम विजेत्यास २५ हजार १, दुसऱ्या विजेत्यास २० हजार १, तिसऱ्या विजेत्यास १५ हजार १ तर ७ उत्तेजनार्थ विजेत्यांना प्रत्येकी ३ हजार १ बक्षिस दिले जाणार आहे.

या स्पर्धेत सहभागी सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र व आकर्षक बक्षिस दिले जाणार आहे. स्पर्धेचे विषय-१. युवा नेते प्रतीकदादा पाटील यांचे कृषी, आरोग्य व उद्योग आदी क्षेत्रातील कार्य, २. माजी मंत्री आ.जयंतराव पाटील यांचे वाळवा तालुक्यातील कार्य, ३. युवा नेते प्रतीकदादा पाटील यांना वाढदिवसाच्या अनोख्या शुभेच्छा असे आहेत.

प्रत्येक व्हिडिओ हा ३० सेकंद ते २ मिनिटांचा असावा, रिल सोलो किंवा ग्रुप घेऊन करू शकता.

हा व्हिडिओ कोणाच्या भावना दुखविणारा नसावा. गुगल फॉर्म भरणे अनिवार्य आहे. तालुका उपाध्यक्ष विशाल माने, रविकिरण बेडके, सौरभ सावंत, सूर्यकांत पाटील, प्रतिक पाटील, श्रेयस चिवटे, जगन्नाथ पाटील, सागर फारणे व सोशल मीडियाचे पदाधिकारी व कार्यकर्ते संयोजन करीत आहेत. अधिक माहितीसाठी ७३७३२०१९१९ वर संपर्क करावा असे संयोजकांनी आवाहन केले आहे.

## सायरस पूनावाला स्कूलमध्ये दिंडी सोहळा उत्साहात

**पेठ वडगाव : हॅलो प्रभात**

आषाढी एकादशी निमित्त डॉ. सायरस पुनावाला इंटरनॅशनल स्कूल मध्ये दिंडी सोहळा मोठ्या उत्साहात झाला. सोहळ्यात शाळेच्या प्रांगणात आकर्षक फुलांनी सजवलेल्या पालखीमधून श्री विठ्ठलाची मूर्ती विराजमान करून मिरवणूक काढण्यात आली. तसेच, वारकऱ्यांच्या वेशभूषेतील बालचमूंनी पालखी मिरवणूक आणि विठ्ठल विठ्ठल या भजनामधून भक्तिमय वातावरण तयार केले. विठ्ठल-रखुमाई, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम व इतर संतांच्या वेशभूषा केलेले बालक प्रमुख आकर्षण ठरले. प्री-प्रायमरी विभागापासून ते ग्रेड १, २ व ३ पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी भाग घेतला. प्रत्येक वर्गाने आपल्या परंपरेप्रमाणे वेशभूषा परिधान करत कार्यक्रमांत सहभाग घेतला.



प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी पालखी यात्रा, भजन आणि अभंग गायन या कार्यक्रमात भाग घेतला. त्यांच्या विठ्ठल विठ्ठल या जपामुळे भक्तिमय वातावरण तयार झाले. प्री-प्रायमरी विभागातील लहान बालकांनीही पारंपरिक वेशभूषा परिधान करून उत्साह वाढवला. सकाळच्या सत्रात, विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषा केली, पालखी नेऊन भक्तिमय वातावरण तयार केले. अभंग गायन, सांस्कृतिक नृत्य आणि परंपरागत कार्यक्रमांमुळे उत्सवाचा रंग खुलला. प्रशासकीय अधिकारी सागर पाटील यांनी सांस्कृतिक वारशाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये भक्ती भावना, एकता आणि परंपरेचे जतन करण्याचा संदेश दिला. या उत्सवाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना प्रसाद वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी प्राचार्य डॉ. सरदार जाधव, प्रशासकीय अधिकारी श्री. सागर पाटील, माध्यमिक विभागप्रमुख श्री. सागर फरांदे, प्राथमिक विभागप्रमुख सौ. मिनल पाटील, पूर्व प्राथमिक विभागप्रमुख कु. आश्लेषा पाटील, ऑलिंपियाड विभाग प्रमुख सौ. अश्विनी पाटील उपस्थित होते.

# नृसिंहवाडीत भाविकांची अलोट गर्दी

**नृसिंहवाडी : हॅलो प्रभात**

गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णु गुरुर्दे वो महेश्वरा, गुरु साक्षात परब्रम्ह' या ओळीप्रमाणे त्रिलोक्याचे स्वामी श्री दत्तगुरूंच्या दर्शनासाठी गुरुपौर्णिमेनिमित्त भाविकांनी अलोट गर्दी केली होती. गुरु व्यासांचा जन्म आषाढ पौर्णिमेला झाला म्हणून व्यासपौर्णिमा अर्थात गुरुपौर्णिमेला सनातन हिंदू धर्मात अनन्य साधारण महत्त्व आहे श्री दत्ताची राजधानी नृसिंहवाडी येथे दत्त चरण दर्शनासाठी गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून हजारो दत्तभक्त हमखास दत्त दर्शनाचा लाभ घेण्यासाठी येतात. सध्या कृष्णा पंचगंगेची पाणी पातळी काही प्रमाणात ओसरली असली तरी दत्त मंदिराभोवती अजून पुराच्या पाण्याचा वेढा कायम आहे. गुरुवार व गुरुपौर्णिमा असा दुर्मिळ योग आल्यामुळे महाराष्ट्र कर्नाटक सह देशाच्या विविध भागातील भाविकांनी आज दत्त दर्शनाचा लाभ घेतला. दत्त चरण कमलावर पुराचे पाणी असल्यामुळे मंदिरातील नित्य कार्यक्रम श्रींच्या उत्सव मूर्तीवर पार पडत आहेत. गुरुपौर्णिमेनिमित्त पहाटे तीन वाजता दिगंबरा दिगंबरा नाम जपाची नगर प्रदक्षिणा पार पडली. यानंतर पहाटे चार वाजता काकड आरती, प्रातःकालीन

## दिगंबरा दिगंबरा नामस्मरणाचा गजर




पूजा सकाळी ८ तें१२ पर्यंत भक्त भाविकांची पंचामृत अभिषेक सेवा पार पडली. दुपारी १२.३० वाजता श्रींच्या उत्सव मूर्तीस महापूजा, दुपारी ३ तें ४ पवमान पंचसूक्त पठण, रात्री ८ नंतर धूप दीप आरती व इंदूकोटी असे नित्य कार्यक्रम पार पडले. त्याचबरोबर येथील वेदपाठ शाळा तसेच अन्य ठिकाणी गुरुपूजन कार्यक्रम पार पडला. मोठ्या प्रमाणात असलेल्या पोलीस बंदोबस्तामुळे भाविकांना श्रींच्या दर्शनाचा लाभ घेता आला. याचबरोबर दत्त देव संस्थानमार्फत आयोजित महाप्रसादाचा १० हजारावर भाविकांनी लाभ घेतला.

पोलिसांच्या मदतीने ग्राम पंचायतीने मंदिर मार्ग अतिक्रमण मुक्त केल्यामुळे भाविकांना ये जा करणे सोयीचे झाले होते. या मार्गावर सर्व प्रकारची वाहतूक बंद करण्यात आली होती. गुरुपौर्णिमा यात्रा चांगल्या प्रकारे पार पडण्यासाठी दत्त देवस्थान अध्यक्ष वैभव काळू पुजारी सचिव गजानन गेंडे पुजारी सर्व विश्वस्त तसेच ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच चेतन गवळी उपसरपंच रमेश मोरे माजी सरपंच धनाजीराव जगदाळे तसेच सर्व सदस्य व ग्रामविकास अधिकारी नियोजन करत होते. गुरु पौर्णिमेनिमित्त पहाटेपासूनच इचरकंजी मिरज जयसिंगपूर शिरोळ कागवाड आदी भागातील दत्तभक्त पायी चालत येताना दिसत होते.

दरम्यान गुरुपौर्णिमेची गर्दी लक्षात घेऊन कुरुंदवाड आगार मार्फत कोल्हापूर सांगली मिरज संभाजीनगर राधानगरी गगनबावडा इचलकरंजी आगाराच्या सहकार्याने जादा बसेसची व्यवस्था केल्याने सर्वसामान्य भाविकांना येथे सुलभतेने आता येता आले.

## प्रशांत गिड्डे यांना वाढदिवस निमित्ताने एक अनोखी भेट



**मोडनिंब : संतोष पांढरे**

प्रशांत गिड्डे यांचा वाढदिवस व गुरुपौर्णिमा चे औचित्य साधून महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना सोलापूर जिल्हाअध्यक्ष राहुल सुर्वे यांनी स्वतः च्या रक्ताने चित्र काढून त्यांना भेट दिली. अशी ही अनोखी भेट देणारे राहुल सुर्वे हे प्रशांत गिड्डे यांचे निकटवर्तीय विश्वासू तसेच आपल्या नेत्यासाठी,ध्येयासाठी,किंवा संघटनेसाठी पूर्णपणे ते समर्पित असतात.कोणत्याही परिस्थितीत आपले ध्येय ते सोडत नाही आणि संघटनेच्या हितासाठी नेहमीच तत्पर म्हणूनच ओळखले जातात.

# ज्ञानवर्धिनी हायस्कूलमध्ये गुरूपौर्णिमा साजरी

**म्हसवड : हॅलो प्रभात**

महाराणी देवी अहिल्याबाई होळकर एज्युकेशन सोसायटी सांगलीच्या म्हसवड येथील ज्ञानवर्धिनी हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज मध्ये गुरूपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य प्रविण स्वामी होते.यावेळी संस्थेचे संचालक लुनेश विरकर,बी. टी.कलढोणे,एस.सी.सावत,के. एस.पाटील,आदीसह सर्व स्टाफ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



इयत्ता बारावी तील विद्यार्थ्यांनी विद्यालयातील सर्व शिक्षकांना गुलाब पुष्प व पेन देऊन गुरूपौर्णिमेच्या शुभेच्छा देऊन कृतज्ञता व्यक्त केली.

यानंतर विद्यालयातील शुभम माने, जोगेश्वरी माने,हिना मुलाणी,आदिती यादव, अनुराधा गाढवे,अनन्या शिंदे,आरव विरकर , श्रावणी शिर्के,शरण्या सरतापे,गौरी लोखंडे, संस्कृती लोखंडे, तुषार माने,माही म्हेत्रे आदी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.प्राचार्य प्रविण स्वामी व लुनेश विरकर यांनी आपल्या मनोगतातून गुरूपौर्णिमा व गुरू चे जीवनातील महत्व विद्यार्थ्यांसमोर वेगवेगळ्या उदाहरणाच्या माध्यमातून स्पष्ट केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संध्या जानकर यांनी केले.तर आभार प्रा.प्रविण नरळे यांनी मानले.

कार्यक्रमाचे आयोजन इयत्ता बारावीतील विद्यार्थ्यांनी प्राध्यापिका आशाराणी खिलारी व सर्व प्राध्यापक यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तमप्रकारे करण्यात आले होते.

# शहीद लेफ्टनंट अथर्व कुंभार यांचे स्मारक व्हावे : दिपक लाड

**पलूस : हॅलो प्रभात**

पलूस आणि कुंडल नगरीचा अनमोल हिरा भारतीय सेनादलातील कमी वयातील लेफ्टनंट अथर्व कुंभार यांना वीरमरण आले. त्यांच्या आजोळी कुंडल येथे क्रांतिवीर कॅप्टन रामभाऊ लाड रणसंग्राम सोशल फाउंडेशन यांच्यावतीने कृतज्ञतापूर्वक अभिवादन शोक सभा आयोजित केली होती. यावेळी शोक सभेत बोलताना रणसंग्राम सोशल फाउंडेशन चे अध्यक्ष दीपक लाड म्हणाले,कुंडल भूमीचा रत्न शहीद लेफ्टनंट अथर्व कुंभार यांच्या रूपाने हरपला, नव्या पिढीला त्यांच्या विचारांचा व कर्तुत्वाचा आदर्श प्रेरक ठरेल यासाठी त्यांचे स्मारक होणे गरजेचे असल्याचे अभिवादन



सभेत बोलताना दीपक लाड यांनी व्यक्त केले. यावेळी किरण तात्या म्हणाले, शहीद लेफ्टनंट अथर्व कुंभार कुंडलचा आमच्या लेकीचा बाळ अत्यंत कर्तृत्ववान होता. याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो. आमच्या कुंडलच्या स्वातंत्र्य सैनिकांचा गौरवशाली वारसा नेटाने पुढे नेणारा तो लेफ्टनंट होता.त्याच्या आकाली जाण्याने कुंडलचे खूप मोठे नुकसान झाले आहे.

यावेळी बाळासाहेब पवार म्हणाले, देशपातळीवरील लष्करातील सर्वोच्च पदावर कमी वयातील लेफ्टनंट अथर्व कुंभार यांच्या जाण्याने कुंडल पलूस सह सांगली जिल्ह्याचे वैभव गेले यावेळी सर्जेराव पवार, अभियंता बी.आर. जाधव,जगदीश पाटील, कुंडलिक एडके, मेजर हिम्मत होवाळ, मेजर, अस्लम मुल्ला प्रकाश भोरे,पट्टणशेट्टी मॅडम, मेजर रामचंद्र लाड, यांनी अभिवादन श्रद्धांजली पर मनोगत व्यक्त केले.

## इस्लामपूरच्या जिजाईचा राज्यात डंका

### शिष्यवृत्ती परीक्षेत राज्यात १२ वा क्रमांक

**इस्लामपूर : हॅलो प्रभात**



येथील अण्णासाहेब डांगे इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थिनी जिजाई गंगनमाले हिने महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती परीक्षेत १२ वा क्रमांक मिळवून शाळेचा आणि संस्थेचा नावलौकिक वाढवला आहे. या अद्वितीय यशाबद्दल शाळेत संस्थेच्यावतीने जिजाईचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. या गौरवाच्या क्षणी संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष, माजी मंत्री अण्णासाहेब डांगे (आप्पा) यांनी तिचे कौतुक करत तिचा विशेष सत्कार केला आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.जिजाईच्या या यशामागे संस्थेच्या मार्गदर्शक नेतृत्वाचा मोलाचा वाटा आहे. तिच्या आई-वडिलांचा तसेच संस्थेचे सचिव ड. राजेंद्र उर्फ चिमणभाऊ डांगे सर, सहसचिव विश्वनाथ बापू डांगे सर, संचालक लक्ष्मण मूर्ती सर, प्राचार्य तिरुपती सर, व्हॉईस प्रिन्सिपल वाहिद मुल्ला सर, प्राथमिक विभागाच्या व्हॉईस प्रिन्सिपल निकिता रावळ मॅडम, कोऑर्डिनेटर अनिसा मॅडम आणि संपूर्ण शिक्षकवृंद यांनी दिलेले मार्गदर्शन आणि मेहनत हेच या यशाचे मुख्य आधारस्तंभ ठरले.

# नैसर्गिक शेतीमुळे अधिक उत्पादन सुनिश्चित होईल

**मुंबई : हॅलो प्रभात**

जेव्हा ग्रामीण भारतात परिवर्तनाची गोष्ट केली जाते, तेव्हा केवळ योजना पुरेशा ठरत नाहीत. त्यामागे एक ठोस विचार, दिशा आणि दीर्घकालीन दृष्टिकोन असणे आवश्यक असते. हीच दूरदृष्टी आज भारताच्या सहकारी चळवळीत आणि कृषी सुधारांमध्ये स्पष्टपणे दिसून येते. देशाच्या सहकारी क्षेत्रात नवचैतन्य निर्माण झाले आहे. ग्रामीण भारताची अर्थव्यवस्था, शेती आणि स्वावलंबनाची गोष्ट निघाली की सहकार या शब्दाचा नैसर्गिकरीत्या उच्चार होतो.अलीकडे अहमदाबादमध्ये झालेल्या 'सहकार संवाद' या कार्यक्रमात, जो की आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमि



त्त आयोजित केला गेला होता, सहकार क्षेत्राशी जोडलेल्या महिलांनी आणि मैदानात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी ज्या आत्मविश्वासाने आपल्या यशकथा मांडल्या, त्यावरून हे स्पष्ट होते की परिवर्तन केवळ कागदावर नाही, तर प्रत्यक्ष जमिनीवर घडत आहे.

या परिवर्तनाचे बीज तेव्हाच पेरले गेले होते, जेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सहकार मंत्रालयाची स्थापना करून त्याला एक स्वतंत्र ओळख दिली आणि हे स्पष्ट केले की ग्रामीण भारताचा विकास गावाच्या सामूहिक ताकदीतूनच होणार आहे. हे बीज वटवृक्षात रूपांतरित करण्याचे श्रेय केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शहा यांना जाते – ज्यांनी या चळवळीला राष्ट्रीय चर्चेचा भाग बनवले आहे.

## जागतिक लोकसंख्या दिन सामाजिक बांधिलकीची जाणीव : डॉ.मिलिंद हुजरे



**तासगाव : हॅलो प्रभात**

लोकसंख्यावाढ ही केवळ एक आकड्यांची गोष्ट नाही, ती शाश्वत विकासासाठी एक मोठे आव्हान आहे. शिक्षण, आरोग्य व स्त्री सक्षमीकरण यामुळेच लोकसंख्येवर योग्य नियंत्रण ठेवता येऊ शकते.जागतिक लोकसंख्या दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण व्हावी असे उद्गार प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे यांनी पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालय तासगाव येथे जागतिक लोकसंख्या दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात बोलताना काढले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जीवशास्त्र प्रमुख प्रा.डी.व्ही. पाटील यांनी केले तर आभार विज्ञान विभाग प्रमुख प्रा.पी. डी.पाटील यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. आण्णासाहेब बागल यांनी केले.कार्यक्रमाला ज्युनियर प्रमुख एस.डी.पाटील, सीईटी प्रमुख प्रा.आर.डी.पाटील, प्रा. आर.एस.पाटील, प्रा.अरुणा सुतार, प्रा.शंतून राऊळकर, प्रा.व्ही.एम.पाटील, प्रा.पुनम सुतार, प्रा.प्रणया पाटील प्रा. प्रणाली पाटील, प्रा.सरिता पाटील, प्रा.गौरी पाटील, प्रा. आर.एम.मुल्ला यांसह महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी - विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लोकसंख्या आटोक्यात ठेवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत : प्रा.डॉ.विजयकुमार पाटील



**कोतोली : हॅलो प्रभात**

जागतिक लोकसंख्या वाढीचा दर लक्षात घेता, शाश्वत विकासासाठी लोकसंख्या नियंत्रण अत्यंत आवश्यक आहे. या दिशेने जागरूकता निर्माण करणे आणि कृतीशील होणे गरजेचे आहे,असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील यांनी केले. श्रीपतराव चौगुले आर्टस् अॅण्ड सायन्स कॉलेज, माळवाडी-कोतोली येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व भूगोल विभागाच्या संयुक्त विद्यमाने जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त आयोजित भित्तीपत्रक प्रकाशन सोहळ्यात ते अध्यक्षस्थानी बोलत होते. कार्यक्रमास संस्था सचिव शिवाजीराव पाटील, डॉ. बी. एन. रावण, डॉ. एस. एस. कुरलीकर प्रमुख उपस्थित होते. यावेळी रसायनशास्त्र विभाग प्रमुख प्रा. तब्बू कवठेकर यांच्या हस्ते भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

# अदाणी ग्रुप उभारणार जागतिक दर्जाचे हेल्थकेअर इकोसिस्टम

**मुंबई : हॅलो प्रभात**

जगभरातील वैद्यकीय तज्ज्ञांच्या उपस्थितीत अदाणी ग्रुपचे चेअरमन श्री गौतम अदाणी यांनी भारताच्या हेल्थकेअर क्षेत्रासाठी एक दूरदृष्टीपूर्ण आणि परिवर्तनात्मक कल्पना मांडली. भविष्यातील गरजांचा विचार करता संपूर्ण आरोग्य व्यवस्थेची नव्याने रचना करण्याची गरज




असल्याचे त्यांनी सांगितले.

'द ताज महाल पॅलेस हॉटेल' येथे आयोजित सोसाइटी फॉर मिनिमली इनवेसिव्ह स्पाइन सर्जरी - एशिया पॅसिफिक च्या पाचव्या वार्षिक संमेलनात बोलताना श्री अदाणी म्हणाले की, भारतात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित, मल्टीडिसिप्लिनरी हेल्थकेअर इकोसिस्टम उभारण्याचा त्यांचा उद्देश आहे - जे जागतिक दर्जाचे, सुलभ, किफायतशीर आणि मोठ्या प्रमाणावर लागू करता येण्याजोगे असेल. आपण भारताच्या उज्ज्वल उद्यासाठी एक एकात्मिक, सर्वसमावेशक आणि प्रेरणादायी हेल्थकेअर सिस्टम तयार करण्यासाठी कटिबद्ध आहोत, असेही ते म्हणाले.

## निधन वार्ता

### जयकर पाटील यांचे निधन




**शिराळा : हॅलो प्रभात**

कार्वे (ता.वाळवा) येथील कार्वे सर्व सेवा सोसायटीचे माजी अध्यक्ष व शिवाजी केन शिराळा चे संचालक जयकर निवृत्ती पाटील (वय ५२) यांचे शुक्रवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, भाऊ, मुलगा व मुलगी असा परिवार आहे.रक्षा विसर्जन रविवारी दि. १३ जुलै २०२५ रोजी कार्वे येथे स. ९.३० वा. होणार आहे.

## इचलकरंजी रोटरी क्लबच्या अध्यक्षपदी संजय घायतिडक

**इचलकरंजी : हॅलो प्रभात**



येथील रोटरी क्लबच्या २०२५ -२६ वर्षासाठी अध्यक्षपदी संजय घायतिडक, सचिवपदी पिरगोंडा (राजू) पाटील, खजिनदारपदी राजाराम जाधव यांची एकमताने निवड करण्यात आली. मावळते अध्यक्ष संतोष पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत या निवडी करण्यात आल्या. या नुतन निवडी आणि बोर्ड ऑफ डायरेक्टर यांचा पदग्रहर सोहळा १२ जुलै रोजी होणार आहे.प्रेसिडेंट इलेक्ट पंकज कोठारी, व्हा.प्रेसिडेंट चंद्रकांत मगदूम, सह सचिव सुनील यळरुटे, क्लब सर्व्हिस किरण पाटील, व्होकेशनल सर्व्हिस सागर पाटील, रोटरेक्ट अँड इंट्रॅक्ट चेअरमन मुकुंद माळी, कम्युनिटी सर्व्हिस शरद देसाई, न्यू जनरेशन अनिल भुतडा, पोलिओ प्लस सुजित मगदूम, सार्जंट ट शिवदास कित्तुरे, लिटरसी कमिटी- संजय खोत, इंटरनॅशनल सर्व्हिस डॉ.अभिजीत कलावडे, युथ सर्व्हिस सुशील माहेश्वरी, फ्रेंडशिप अँड फेलोशिप नितीन भागवत, इमिजेट पास्ट प्रेसिडेंट संतोष पाटील, रोटरी वेल्फेअर ट्रस्ट चेअरमन प्रकाश गौड यांचा बोर्ड ऑफ डायरेक्टर मध्ये समावेश आहे. या निवडीचा पदग्रहण समारंभ १२ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता रोटरीचे माजी गव्हर्नर संग्राम पाटील यांच्या हस्ते आणि उत्कर्षा पाटील (चेअरमन इनरव्हिल डिस्ट्रिक्ट, उपप्रांतपाल सुदर्शन कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत राधे बंकट हॉल, जवाहरनगर, इचलकरंजी येथे होणार आहे.

# इचलकरंजी विधानसभा तीन मंडल अध्यक्षांच्या निवडी जाहीर

**इचलकरंजी : हॅलो प्रभात**

दोन महिन्यांपासून प्रलंबित राहिलेल्या भारतीय जनता पार्टीच्या इचलकरंजी विधानसभा मंडलच्या ग्रामीण, शहर पूर्व आणि शहर पश्चिमच्या निवडी गुरुपौर्णिमेच्या दिवशी जाहीर करण्यात आल्या. इचलकरंजी ग्रामीण अध्यक्षपदी बाळासाहेब वाल्मिक माने, इचलकरंजी शहर पूर्व अध्यक्षपदी श्रीरंग शिवाजी खवरे आणि इचलकरंजी शहर पश्चिम अध्यक्षपदी शशिकांत





बाबुराव मोहिते यांची निवड करण्यात आली आहे. भाजपाचे कोल्हापूर जिल्हाध्यक्ष (ग्रामीण) राजवर्धन नाईक-निंबाळकर यांनी या निवडी जाहीर केल्या. इचलकरंजी विधानसभा मतदारसंघातील तीन मंडलच्या अध्यक्षपदी बाळासाहेब माने (ग्रामीण), श्रीरंग खवरे (पूर्व) आणि शशिकांत मोहिते (पश्चिम) नांवे निश्चित करण्यात आली होती. परंतु काही कारणास्तव या निवडी जाहीर करण्यात आल्या नव्हत्या. यामध्ये पूर्व अध्यक्षपदाच्या नांवावरून या निवडी दोन महिन्यांपासून रखडल्या होत्या, अखेर गुरुपौर्णिमेच्या दिनी भाजपाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण, प्रदेश महामंत्री राजेश पांडे यांच्या आदेशावरून जिल्हाध्यक्ष राजवर्धन नाईक-निंबाळकर यांनी यां कोल्हापूर ग्रामीण पूर्व जिल्हा कार्यक्षेत्रातील प्रलंबित इचलकरंजी विधानसभेतील तीन मंडल अध्यक्षांच्या नांवाची घोषणा केली आहे. त्यामध्ये इचलकरंजी ग्रामीण अध्यक्षपदी बाळासाहेब माने, इचलकरंजी शहर पूर्व अध्यक्षपदी श्रीरंग खवरे आणि इचलकरंजी शहर पश्चिम अध्यक्षपदी शशिकांत मोहिते यांची निवड करण्यात आली आहे. या कामी माजी वस्त्रोद्योग मंत्री प्रकाश आवाडे, आमदार राहुल आवाडे यांचे प्रयत्न यशस्वी ठरले.

# व्यवसायिकांसाठी खुशखबर

सांगली, कोल्हापूर, सातारा, सोलापूर, पुणे,
अहमदनगर सह संपूर्ण महाराष्ट्रात
डिजिटलच्या माध्यमातून तब्बल सात लाख वाचकांपर्यंत
पोहोचणाऱ्या दैनिक **हॅलो प्रभात** सोबत
आपल्या व्यवसायाची जाहिरात करण्याची...



## सुवर्णसंधी



| जाहिरात साईज | प्रसिद्धी कालावधी | किंमत |
|---|---|---|
| 08X05 cm | संपूर्ण महिना | ३००० / - |
| 08X10 cm | संपूर्ण महिना | ५००० / - |
| 12X10 cm | संपूर्ण महिना | ७५०० / - |

टीप : सदर जाहिरातीचे दर हे फक्त डिजिटल आवृत्तीसाठी लागू आहेत.

**शुभेच्छा जाहीरात, जाहीर नोटीस,**
**छोट्या जाहीराती, टेंडर नोटीस व सर्व प्रकारच्या**
**जाहीरात प्रसिद्धीसाठी...**

## एकवेळ अवश्य संपर्क साधा

# दै.हॅलो प्रभात

**फोन : 9094277171 / 9011889001**

• छापील प्रत मिळिवण्यासाठी संपर्क : 9021651976